महाराष्ट्र विधानसभा
तिसरे अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २०, १९३७ (शके)

u

(1) **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
(2) **आदिवासी विकास मंत्री**
(3) **उद्योग मंत्री**
(4) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
(5) **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

 यांचे प्रभारी विभाग

u

प्रश्नांची एकूण संख्या - १०८

---

u

जाफराबाद तालुक्यातील (जि.जालना) दोनशे शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

u

(1) * **u३३५८७ uuश्री.अर्जुन खोतकर (जालना) I: I** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) जाफराबाद तालुक्यातील (जि.जालना) दोनशे शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम टेंभूर्णा येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरव्यवहारामुळे प्रलंबित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली तसेच या शेतकऱ्यांची पिकविम्याची रक्कम देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही, हे खरे नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

u
नागपूर शहरातील रविनगर वसाहतीच्या देखभाल व दुरुस्तीबाबत
u
(2) * u३६३२६ uuश्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण)ण:ण सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) नागपूर शहरातील रविनगर शासकीय वसाहतीमधील कर्मचा-यांकडून चारशे ते पाचशे रुपये मेंटेनन्स खर्च वसुल करुनसुध्दा सार्वजनिक बांधकाम विभाग देखभाल व दुरुस्ती करीत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या वसाहतीच्या देखभाल व दुरुस्तीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यकारी अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली परंतु ते गाळ्यांच्या देखभाल व दुरुस्तीकडे विशेष लक्ष देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या वसाहतीमधील गाळ्यांना लागलेली गळती, नळाच्या तोट्या जीर्ण झाले असून गाळ्यांची रंगरंगोटी, मेंटेनन्स व डागडुजीची कामे अनेक वर्षांपासून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या वसाहतीमधील देखभाल व दुरुस्तीच्या कामांकडे दुर्लक्ष करणा-या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांच्या

कामांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही, तथापि, शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनातून नियमानुसार घरभाडे भत्याची वजावट होते.

(2) हे खरे नाही.

(3) सदरील वसाहतीमधील निवासस्थाने ही जुनी असल्यामुळे मोठया प्रमाणात दुरुस्ती आवश्यक आहे, तथापि आवश्यकतेनुसार वेळोवळी निधी उपलब्धतेनुसार दुरुस्ती करण्यात येत असते.

(4) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मुंबई-पुणे-नाशिकला जोडणाऱ्या ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील कोपरी उड्डाणपुलाच्या चार अतिरिक्त लेन वाढविण्याबाबत

(3) * u३१६३२ uuश्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)ी:ी सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मुंबई-पुणे-नाशिकला जोडणाऱ्या ईस्टर्न एक्सप्रेस हायवेवरील कोपरी उड्डाणपुलाच्या चार अतिरिक्त लेन वाढविण्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने या पूलाचा खर्च तब्बल १३२ कोटी रुपयांपर्यंत वाढला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले तसेच त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.
या कामास महाराष्ट्र शासनाने दि. १२/१/२००१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रु. ९०० लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.` पुलाच्या कामाच्या तपशीलास रेल्वे विभागाची मान्यता प्राप्त घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी रेल्वेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आहे. रेल्वेने पूलाच्या कामात काही संरचनात्मक बदलल सुचवून पूलाची उंची ०.८५ से.मी. ने वाढवण्याच्या सुचना दिल्या व त्यानुसार पुलाचा मांडणी नकाशा दि.१५/४/२०१५ रोजी मान्य केला आहे.
uuuu सन २००१ ते २०१५ या कालावधीत झालेली भाववाढ व संरचनात्मक बदलामुळे होणारी वाढ यांचा विचार करुन प्रकल्पाची किंमत रु. ११३.७४ कोटी इतकी होते. या रकमेच्या सुधारीत अंदाजपत्रकास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे.
uuuu तसेच प्रस्तुत काम मुंबई विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचा निर्णय शासनाने घेतला असून काम त्यांच्यामार्फत हाती घेण्याचे नियोजन आहे.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यात श्रावणबाळ व संजय गांधी निराधार योजना कार्यालयाकडून लाभार्थ्यांना अनुदान मिळत नसल्याबाबत

(4) * u३३९५० uuकुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य)य:य सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) सोलापूर जिल्ह्यातील जेष्ठ नागरिक, निराधार महिला , अपंग, विधवा, कुष्ठरोगी अशा लाभार्थ्यांना श्रावणबाळ व संजय गांधी निराधार कार्यालयाकडून मागील ८ ते ९ महिन्यांपासून अनुदान मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, लाभार्थ्यांचे अनुदान वेळेवर मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(4) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) व (२)२ हे खरे नाही.
सोलापूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांचे माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंतचे अनुदान त्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे.
(3) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

श्रीगोंदा (जि.अहमदनगर) हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लाभार्थ्यांना घरकुल देण्याबाबत

u

(5) * u२९५५५ uuश्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)ी:ी सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1)1 श्रीगोंदा (जि.अहमदनगर) हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील १४ लाभार्थ्यांची यादी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर यांचेकडे पाठवून घरकुल मंजूरीकरता शिफारस करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर बाबीला एक वर्ष होवून देखील याप्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांनी माहे सप्टेंबर, २०१५ च्या दरम्यान मा.सामाजिक न्याय मंत्री व आयुक्त यांना पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार सदरची घरकुल योजना। मंजूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?u

श्री. राजकुमार बडोले : (१) होय.

(2) होय.
(3) होय.
(4) व (५) संबंधित कार्यान्वयन यंत्रणेमार्फत मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

---

u

अहमदपुर (जि.लातुर) येथील निये ाजित सुतगिरणीसाठी शेतकऱ्यांकडून उभारण्यात आलेले भागभांडवल त्यांना परत करण्याबाबत

u

(6) * u३४७३६ uuश्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) ा: ा सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) अहमदपुर (जि.लातुर) येथील नियोजित यशवंत सहकारी सुतगिरणीसाठी सन १९८५-८६ मध्ये शेतकऱ्यांकडून १ कोटी रुपयांचे भागभांडवल उभे करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, ही सुत गिरणी अद्यापपर्यंत सुरु झालेली नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेअर्सचे पैसे व्याजासहित त्यांना परत करण्याचे आदेश संबंधितांना द्यावे अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी तसेच लातूर अहमदपूर मधील अनेक जिल्हा परिषद सदस्यांनी व नेत्यांनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ८/१०/२०१५ रोजी केली, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही, सदर गिरणीची नोंदणी दिनांक २३/९/१९९२ रोजी झाली असून गिरणी नोंदणीचे वेळी वसूल भागभांडवल रु. ३,०५,०००/- होते. दिनांक ३१/३/२०१० चे ताळेबंदानुसार रु.३०,५७,५००/- वसूल भागभांडवल होते.
uuuuuu सदर सहकारी सूतगिरणीचे रुपांतर जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या दि. १८.०१.२०१० च्या आदेशान्वये महेश सहकारी वस्त्रोद्योग औद्योगिक संस्था मर्या., शिरुर (ता), ता.अहमदपूर,

जिल्हा लातूर करण्यात आले असूनन सदर सूतगिरणीचे रुपांतर झ ाल्याने वस्त्रोद्योग संचालनालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २१(अ) अंतर्गत देणी/घेणी वर्ग करुन सदर सूतगिरणीची नोंदणी दि.१५.६.२०१० च्या आदेशान्वये रद्द केली आहे.

(2) खरे नाही.

(3) प्रश्न उद्भ ावत नाही.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी शासकीय वसतिगृह व आश्रमशाळांतील असुविधांबाबत

u

(7) * u२८९४३ uuडॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.विजय औटी (पारनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी)ी:ी सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विशेषत: ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यातील आदिवासी शासकीय वसतीगृहात व आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना शुध्दपाणी, शैक्षणिक सुविधा, मुलींची सुरक्षा, निर्वाह भत्ता, दर्जेदार जेवण व इमारतींची दुरुस्ती या विविध मागण्यांसाठी हजारो आदिवासी विद्यार्थ्यांनी दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी मोर्चा काढून ठाणे अप्पर आयुक्तांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच याच सुमारास आदिवासी वसतिगृहे व आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या निवेदनातील असुविधांबाबत विद्यार्थ्यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी आमरण उपोषण केले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त विद्यार्थ्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) ठाणे विभागातील आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी मुलभूत सोयी सुविधा तसेच इतर मागण्यांसाठी दि. ०३.०८.२०१५ रोजी अपर आयुक्त ठाणे कार्यालयावर मोर्चा काढला होता हे खरेआहे.
(2) आदिवासी मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृह, कोळवाडी, पनवेल व आदिवासी मुलांचे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, वाडा तसेच आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, पेण, सुधागडपाली, कर्जत, महाड, नेरळ या वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी दि. ३०.०८.२०१५ पासून आपापल्या वसतीगृहाच्या आवारात बेमुदत उपोषण सुरु केले होते.
(3) व (४) उक्त प्रकरणी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या असून सदर विद्यार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंतचा निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे.
uuuu आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, पेण येथील विद्यार्थ्यांनी दि. ०३.०९.२०१५ रोजी, आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह सुधागडपाली, महाड, नेरळ व कर्जत येथील विद्यार्थ्यांनी दि. ०४.०९.२०१५ रोजी व आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, कोळवाडी व आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, खांदा कॉलनी, पनवेल येथील उपोषणात सामील विद्यार्थी व विद्यार्थीनींनी दि. ०८.०९.२०१५ रोजी स्वत:हून उपोषण मागे घेतले.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यात तयार कापडाकरीता प्रोसेसिंग उद्योग सुरु करण्याबाबत

u

(8) * u३३१६० uuश्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य)य:य सन्माननीय

वस्त्रोद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) मालेगाव (जि.नाशिक) या तालुक्यात तयार होणाऱ्या कापडावर मालेगाव तालुक्यातच प्रोसेसिंग करण्यासाठी उद्योग सुरु करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वस्त्रोद्योग मंत्री यांना दिनांक २९ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू निवेदनांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3)3 नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय, हे खरे आहे.
(2) स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन प्राप्त होण्यापुर्वीच केंद्र शासनाने सुक्ष्म व लघु उपक्रम समूह विकास योजनेअंतर्गत (MSE-CDP) या योजनेअंतर्गत सामायिक सुविधा केंद्र (कॉमन फॅसिलिटी सेंटर CFC) टेक्सटाईल क्लस्टर मालेगांव जि. नाशिक या प्रकल्पास रु.१५८४.४७ लाख इतक्या प्रकल्प किंमतीस तसेच विशेष हेतू वाहन (SPV)u म्हणून मे. बळीराम हिरे हाय-टेक टेक्सटाईल क्लस्टर सर्व्हीसेस प्रा.लि. मालेगांव यांना नियुक्त करण्यास मंजूरी दिली आहे. सदर सामायिक सुविधामध्ये (CFC) प्रोसेसिंगच्या सेक्शनल वार्पिंग यार्न, डायरेक्टर वार्पिंग, ऑटो सायझिंग, ब्लिचिंग रेंज, मर्सरायझिंग आणि स्ट्रेंटनिंग फॅसिलिटी व तपासणीकरिता प्रयोगशाळा यांचा समावेश आहे.` सदर प्रकल्पास राज्य शासनाच्या सहभागाचे अनुदान उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत रु. ६०.०० लाख (प्रथम टप्पा) दिनांक २९/३/२०१४ रोजी व रु. ६०.००० लाख (दुसरा टप्पा) । दिनांक २७/११/२०१४ रोजी तसेचच मा. लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झ ाल्यानंतर रु.३०.०० (तिसरा व अंतीम टप्पा) दिनांक २४/११/२०१५ रोजी मंजूर करण्यात आला आहे.
(3) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

खामगांव-जालना या मार्गाच्या चौपदरीकरणाचे बंद पडलेले काम सुरु करण्याबाबत

u

(9) * u२९७४८ uuश्री.राहुल बोंद्रे (चिखली)ी:ी सन्माननीय

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) खामगांव-जालना या मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम बीओटी तत्वावर करण्यात येत असून सदर काम आतापर्यंत दोन कंत्राटदारांना देण्यात आले परंतु दोन्ही कंत्राटदारानी काम सोडल्याने या रस्त्याचे बांधकाम बंद पडले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, चिखली ते खामगांव मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे वर्ग केला असून खामगांव ते जालना मार्ग हा राज्यशासनाच्या अखत्यारीत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर महामार्गाचे बंद पडलेले काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) असल्यास, उपरोक्त प्रश्न २ नुसार एकाच मार्गाचे दोन भाग झ ाल्याने केंद्रीय रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण याबाबत राज्य शासनाने ताळमेळ साधून या रस्त्याचा विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली ीवा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

खाजगीकरणांतर्गत दोन प्रकल्प मंजुर होते.

अ) जालना - देऊळगाव राजा-बेराळा फाटा रा.मा.क्र. १७६. देऊळगांव शहर वळणरस्त्यासह.

ब) बेराळा फाटा ते चिखली अमडापूर-खामगांव ते राज्यमार्ग क्र. ६ पर्यंत. प्रकल्पाचे कंत्राटदार.

मुळ उद्योजक- मे.केटी कन्स्ट्रक्शन लि.व केटी कन्स्ट्रक्शन (इंडिया) लि. (जे.व्ही)

पर्यायी उद्योजक - विंध्यवासीनी मेगा स्ट्रक्चर प्रा. लि. मुंबई

uuuu उपरोक्त दोन्ही उद्योजकांनी काम पूर्ण न केल्याने दिनांक २१ जानेवारी, २०१४ रोजी त्यांचे Toll Right निलंबित करुन करारनामा रद्द करणेबाबत कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(2) हे अंशत: खरे आहे.

uuuu चिखली ते जालना ही लांबी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३A मध्ये समाविष्ठ आहे. सदर रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच खामगांव ते चिखली ही लांबी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करणेबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येत आहे.

(3) बेराळा फाटा-चिखली-अमडापूर-खामगांव या लांबीतील मूळ उद्योजक व पर्यायी उद्योजक यांचे करारनामा रद्द करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच देऊळगांवराजा वळण रस्त्याकरिता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे सन २०१५-१६ मध्ये रु. ६५.२४ कोटी निधी मंजूर आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे कार्यवाही प्रगतीत आहे.

(4) बेराळाफाटा ते जालना ही लांबी राष्ट्रीय महामार्ग मध्ये समाविष्ठ आहे.

खामगांव चिखली बेराळफाटापर्यंत पैकी खामगांव ते चिखली लांबी राष्ट्रीय महामार्ग मध्ये समाविष्ठ करणेबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येत आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

यवतमाळ जिल्ह्यातील हिवरीसह सर्वच शासकीय पोस्ट बेसीक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध न झाल्याबाबत

u

(10) * u३०६२० uu**श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) यवतमाळ जिल्ह्यातील हिवरीसह सर्वच शासकीय पोस्ट बेसीक आश्रमशाळेत शासनाकडून विद्यार्थ्यांना मिळणारे गणवेश अद्यापही उपलब्ध झाले नसल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शाळा सुरु होऊन ६ महिन्याचा कालावधी संपूनही विद्यार्थ्यांना गणवेश न मिळाल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली,

(3) तसेच यापुढे शाळा सुरु होण्याअगोदर विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.
(2) गणवेश कापडाबाबत आदिवासी विकास आयुक्तालयामार्फत दोन वेळा निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदेत दोनही वेळेस नमुने स्पेसिफीकेशन नुसार नसल्याने` तीस-यांदा ई-निविदा प्रसिध्द करावी लागली त्यामध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांसस आयुक्तालयामार्फत दिनांक ०७/११/२०१५ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.
(3) सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शाळा सुरु होण्याअगोदर गणवेश उपलब्ध होण्यासाठी खरेदीची प्रक्रिया विहीत वेळेतच राबविण्यात येणार आहे.
(4) प्रश्न उद्भ्वत नाही.

वानिवडे-मोंड (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) दरम्यान खाडीवरील पुलाच्या बांधकामास होत असलेल्या विलंबाबाबत

u

(11) * u३२४३३ uu**श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.नितेश राणे (कणकवली)ी:ी** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) वानिवडे-मोंड (ता.देवगड,जि.सिंधुदुर्ग)ग दरम्यान खाडीवरील पुलाच्या कामास शासनाने आर २९९६/प्रक्र.५०० नियोजन इ. दिनांक १५ मार्च, १९९६ अन्वये प्रशासकीय मंजुरी देवून सन १९९६-९७ व तद् नंतर पुन्हा १९९७-९८ मध्ये आर्थिक तरतूद केलेली असतानाही आजमितीस सदरहू पुलाच्या बांधकामास सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदरहू पुलाचे बांधकाम सुरू करण्यास होत असलेल्या विलंबामुळे त्या परिसरातील सुमारे २५ गावांना पुलाअभावी अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे सदरहू पुलाचे काम विना विलंब हाती घेवून पूल लवकरात लवकर वाहतुकीसाठी

कार्यान्वित व्हावा या मागणीसाठी तेथील ग्रामस्थांनी मागील १५ वर्षांपासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कणकवली, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, देवगड आदींकडे लेखी निवेदन सादर करून प्रत्यक्ष भेट घेवून मागणीही केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाकडे सातत्याने मागणी करूनही सदरहू पुलाचे काम आजमितीस हाती न घेतल्यामुळे दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ रोजी स्थानिक पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी वानिवडे खाडी पात्रात उतरून लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्धार करून त्याविषयी शासनाला कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) सदरहू पुलाचे काम विनाविलंब हाती घेवून सदरहू पूल लवकरात लवकर वाहतुकीसाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.

(2) होय.

(3) होय.

(4) शासन निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम नाबार्ड कार्यक्रमांतर्गत/अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्याचा प्रयत्न राहील.

(5) प्रश्न उद्भ्वित नाही.

---

u

मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा बोईसर ते चिल्हार फाटा रस्ता दुरुस्त करण्याबाबत

u

(12) * u३५५१३ uuश्री.विलास तरे (बोईसर)र:र सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) तारापुर औद्योगिक वसाहतीला आणि मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र.८ ला जोडणारा बोईसर ते चिल्हार फाटा या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून सदरहू रस्त्यावरर खड्डे पडल्याने वाहने चालविताना तसेच प्रवास करताना वाहनचालक, नागरिक व

विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती एमआयडीसी तारापूर मार्फत केली जाते, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती ी करण्याबाबत व प्रवाशांची होणारी गैरसोय कमी होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u
श्री. सुभाष देसाई : (१) हे खरे नाही.
(2) व (३)३ चिल्हार- बोईसर हा तारापूर औद्योगिक क्षेत्राला जोडणारा एकूण १६.५ किमी लांबीचा रस्ता आहे. त्याची देखभाल व दुरुस्ती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत केली जाते.
uuuuचिल्हार-बोईसर या रस्त्यावर पावसाळा सुरु असताना काही ठिकाणी खड्डे पडले होते. ते खड्डे वेळोवेळी खडी-मुरुमाने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुयोग्य ठेवण्यात आला होता. पावसाळा संपल्यानंतर ऑक्टोबर, २०१५ अखेरीस सदर खड्डे डांबरीकरण करुन दुरुस्त करण्यात आलेले आहे. सध्या या रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.
uuuuसदर रस्त्यावर वाढत्या वाहतूकीचा विचार करुन महामंडळाने १६.५ किमी लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे चौपदरीकरण करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता दिली असून रस्त्याच्या सर्वेक्षणाचे व सीमांकनाचे काम सुरु असून सदर काम ३६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे.`
(4) प्रश्न उद्भ वत नाही.

मुंबई-बंगळूरू महामार्गावरील जांभूळवाडी दरीपुलाखालील रस्त्यावर असलेल्या पूलाच्या दुरुस्तीबाबत

u
(13) * u२९००७ uuश्री.भिमराव तापकीर (खडकवासला) T: T
सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) मुंबई-बंगळूरू महामार्गावरील जांभूळवाडी दरीपुलाखालील रस्त्यावर असलेला पूल दोन वर्षांपासून खचलेला असून पुलाची दुरुस्ती त्वरीत न झाल्यास पूल आणखी खचून भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकते असे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रिलायंस इंफ्रा कंपनीने हे काम आमच्या निविदेत नसल्याचे कारण देऊन दुरुस्ती कामास नकार दिला हे खरे आहे काय,

(3) असल्यास, खडी, डबर, पाण्याचे टँकर, शालेय बस या जड वाहनांमुळे मोठी दुर्घटना घडू शकते त्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय, हे खरे आहे. तथापि प्रश्नांकीत ठिकाणी कायमस्वरुपी उपाय म्हणून नविन पुलबांधेपर्यंतत आवश्यक त्या सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे` यांनी कळविले आहे.

(2) होय, सदर काम सवलतकरारनाम्यामध्ये नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे` यांनी कळविले आहे.

(3) प्रश्नांकीत ठिकाणी स्वतंत्र अभियंता (Independent Engineer)u मार्फत सर्वेक्षण करुन अस्तित्वातील पाईप मोरी तोडण्याचे व त्या ठिकाणी पुरेशा रुंदीचे` बॉक्स कलवर्ट (पुल) बांधण्याचे अंदाजपत्रक तयार करुन केंद्रशासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे दि. १२ नोव्हेंबर, २०१५ ला मंजुरीस्तव पाठविण्यात आले आहे. अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाल्यानंतर तातडीने काम सुरु करण्यात येईल असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

राज्यात ५२० शैक्षणिक संस्थांना समाज कल्याण व आदिवासी विकास विभागाने नियमबाह्यपणे ५०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती वितरित केल्याबाबत

u

(14) * u३२४८२ uu**श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर)**र:र सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यात एआयसीटीई अंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या परवानगीने`` सन २०१४ पर्यंत ५२० संस्था सुरु केल्या असून या संस्थांना सन २००१-०२ ते २०१४-१५ पर्यंत समाज कल्याण व आदिवासी विकास विभागाने नियमबाह्यपणे ५०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती वाटप केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने` नियमबाह्यपणे संस्थांना शिष्यवृत्तीचे वाटप करणाऱ्यांवर व खोटा अहवाल देवूनन कोट्यवधी रुपयांचा अपहार करणाऱ्या संस्थांचालकांवरर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. राजकुमार बडोले : (१) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

यवतमाळ जिल्ह्यातील (ता.महागाव) येथील रस्त्याच्या दुरुस्ती खर्चाबाबत

u

(15) * u२९२८४ uu**श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**ी:ी सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) यवतमाळ जिल्ह्यातील (ता. महागाव) येथील रस्त्याच्या डागडुजीसाठी ८० लाख रुपये खर्च करुनही महागाव ते सवना हा रस्ता जैसे थेच असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पूरहानीच्या नावाखाली रस्त्याच्या ६२ ते ६४

किलोमीटर्समध्ये ८० लाख रुपयांचा खर्च करण्यात आला, परंतु खर्चाच्या तुलनेत या रस्त्यावर कोठेच काम झाले असल्याचे आढळून आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्ती खर्चाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडे शासनाचे सुमारे ११८ कोटी थकित असल्याबाबत

u

(16) * u३६२५८ uu**श्री.सुनिल शिंदे (वरळी)**ी:ी सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडील बुडीत व संशयित कर्जात शासनाचे सुमारे ११८ कोटी रुपये थकित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.` राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडे दि. ३१/०३/२०१५ अखेर एकूण उचल केलेल्या कर्जाची रक्कम रु. ११८४.१४ कोटी एवढी असून सदर कर्जापैकी थकीत रक्कम व्याजासह रु. ८०८.५७ कोटी आहे.

(2) सदर कर्जापोटी आर्थिक वर्ष सन २०१४-१५ मध्ये रु. १११.८५ कोटी व्याजासह वसुल केले असून आर्थिक वर्ष अखेर व्याजासह

एकूण वसुल रक्कम रु. ५१६.९३ कोटी एवढी आहे. वसुलीबाबतचे प्रयत्न चालू आहे.

(3) साखर कारखान्याचे व्यवहारर बंद असणे, अवसायन, मालमत्ता विक्री इ. कारणांशिवाय गत २ वर्षापासून साखरेच्या दरातील घसरणीमुळे कारखान्यांचा प्राधान्यक्रम ऊस दरापोटी एफ.आर.पी. अदा करणे असल्याने वसुली काही प्रमाणात प्रभावित झाली आहे.

राज्यातील भटक्या व विमुक्त जमातीसाठी असलेली क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करण्याबाबत

(17) * u३१८७७ uu**श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई)ई:ई** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील भटक्या व विमुक्त जमातीसाठी असलेली क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करावी असे सुमारे ११ वर्षापूर्वी मागासवर्गीय आयोगाने सुचविले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ही अट शासनाने रद्द केली आहे काय, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, भटक्या व विमुक्त जमातीसाठी क्रिमिलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करावी अशी मागणी संघर्ष वाहिनी, नागपूर यांनी शासनाकडे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, यावर कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे ?

श्री. राजकुमार बडोले : (१) नाही.

(2) विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(3) नाही.

(4) विमुक्त जाती व भटकया जमाती यांना क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळयाबाबतचा प्रस्ताव सर्वोच्च न्यायालयाचे मत घेऊन मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाबाबत

u

(18) * u३५११४ uu**श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व)व:व** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) वांद्रे (पूर्व) येथील शासकिय वसाहतीमधील इमारती धोकादायक झ ाल्याने त्या पाडण्याचे काम सुरु झाले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, धोकादायक इमारतीमधील शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कोठे पर्यायी जागा देण्यात आली आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(3) तसेच शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासात रहिवासी तसेच कर्मचाऱ्यांना सामावून घेऊन मालकी हक्काने घरे देण्यासंदर्भात गृहनिर्माण राज्यमंत्री यांच्या दालनात दिनांक ०७ जुलै, २०१५ रोजी झ ालेल्या बैठकीत मा.गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत हे ही खरे आहे काय, असल्यास, याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(4) असल्यास, त्यानुसार शासकीय वसाहतीतील २८८ इमारतींच्या पुनर्विकासाबाबत व धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना पर्यायी जागा देण्याबाबत तसेच सदर शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(2) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील ३ चौकामधील इमारतींचे संरचनात्मक परीक्षण तज्ञ सल्लागारांनी केलेले असून त्यांच्या सल्ल्यानुसार एकुण २१२ सदनिका सुरक्षिततेचा उपाय म्हणून रिक्त केलेल्या असून त्यांना याच वसाहतीत पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(3) शासकीय निवासस्थाने, ट्रान्झिट क्वार्टर्स, विश्रामगृह व अन्य सुविधांची तरतूद असलेला खाजगीकरणांतर्गत हाती घ्यावयाचा प्रकल्पाचा अहवाल तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार

नेमण्याची निविदा प्रक्रिया कार्यवाही प्रगतीत आहे.
(4) एकुण २१२ सदनिका सुरक्षिततेचा उपाय म्हणून रिक्त केलेल्या असून त्यांना याच वसाहतीत पर्यायी निवासस्थान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.त तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे देणे ही बाब सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(5) प्रश्न उद्भ ावत नाही.

पुणे जिल्ह्यातील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील रिक्त पदे भरणेबाबत

(19) * u३२८८७ uuश्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ)ळ:ळ सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या चार जिल्ह्यांचे मुख्य कार्यालय घोडेगाव (ता आंबेगाव, जि. पुणे) येथे कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या कार्यालयात कायमस्वरुपी प्रकल्प अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या प्रकल्पाअंतर्गत २२ आश्रमशाळा व सुमारे २४ वसतीगृहे चालवली जातात, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, या कार्यालयात अनेक पदे रिक्त असुन या सर्व जागांवर प्रभारी अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या ा आहेत, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, ही सर्व रिक्तपदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. विष्णु सवरा : (१) होय, हे खरे आहे.
(2) प्रकल्प अधिकारी , एकात्मिक आदिवासी विकासप्रकल्प, घोडेगाव हे पद दिनांक १७.७.२०१५ पासुन रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीम. सी. डी .मोरे, सहायक प्रकल्प अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आलेला आहे.
(3) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ,घोडेगाव अंतर्गत २३ शासकीय आश्रम शाळा व २४ वसतिगृहे चालविली जातात.
(4), (5) व (६) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ,घोडेगाव अंतर्गत

सर्व संवर्गातत मंजूर असलेल्या एकूण ८६० पदांपैकी ५७६ पदे भरलेली असून २८४ पदे रिक्त आहेत. व रिक्त असलेल्या पदांचा कार्यभार इतर कार्यरत अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. गट- अ व गट- बब संवर्गातील प्रकल्प अधिकारी व सहायक प्रकल्प अधिकारी ही पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याबाबत शासनस्तरावर तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. गट-कक संवर्गातीलल रिक्त असलेली बहुतांशश पदे ही शिक्षक संवर्गातील असून सदरर पदे भरण्यासाठी दि.२५ जुलै, २०१४ रोजी जाहिरात दिलेली असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. गट- ड संवर्गातील पदे भरण्यासाठी संबंधित संवर्गाचीी बिंदुनामावली नोंदवही तपासणीची कार्यवाही सुरु आहे.

मूर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील पेंढी नदीवरील पुलाजवळील भराव खचल्याबाबत

(20) * u२९६२६ uu**श्री.अमित झनक (रिसोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)ीःी** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मूर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गैरकारभारामुळे पेंढी नदीवरील पुलाजवळील भराव खचल्याने बल्लारखेडजवळील वाहतूक बंदद झाली असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर नदीवरील पुलाजवळील रस्त्यांची अनेकवेळा दुरुस्ती करुनही भराव खचत असल्याने या कामात निकृष्टता झाली असल्याचे आढळून येत आहेत,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व असल्यासस संबंधितावर शासनाने काय कारवाई केली वा करणार आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१)१ हे खरे नाही.
uuuu दि.५ ऑगस्ट २०१५ रोजी अमरावती,अकोला जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पेढी नदीला मोठा पूरर आला व त्यात सदर ठिकाणच्या बुडीत पूल वजा बंधाऱ्याच्या पोचामार्गाचे नुकसान होऊन पोचमार्ग क्षतिग्रस्त झाल्याने सदर ठिकाणची वाहतूक बंद झाली होती.
(2) सदर नदीवर पुलाचे बांधकाम हे पूल वजा बंधारा स्वरूपाचे आहे.पेढी नदीपासून ५ कि. मी. अंतरावरुन वाहणाऱ्या पूर्णा नदीच्या बॅक वॉटरमूळे पेढी नदीचे पाणी थोपून जाते,त्यामुळे पुराच्या पाण्यास अडथळा निर्माण होतो,परिणामी पोचमार्गाचे मातीचे भराव वाहून जातात.तातडीची उपाय योजना म्हणून फक्त माती भरावाचे काम करण्यात येते व वाहतूक सुरळीत करण्यात येते. कायमस्वरूपी उपाय योजना म्हणून योजनेतर कार्यक्रमांतर्गत रु. ११५.०० लक्ष किमतीचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे हे काम लवकरात लवकर हाती घेण्यात येईल.
(3)3प्रश्न उद्भवत नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर येथील लक्ष्मी-विष्णू मिलमधील कामगारांना घरे मिळण्याबाबत

u

(21) * u३३४८३ uu**श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा)** I: I सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) सोलापूर येथील लक्ष्मी-विष्णू मिल मधील कामगारांनी घरे मिळण्याच्या मागणीसाठी दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर मिल कामगारांच्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.

(2) दि. लक्ष्मी-विष्णू टेक्सटाईल मिल लि.सोलापूर ही खाजगी मिल सन १९९५ मध्ये बंद झाली असून मिलच्या कामगार संघटना, मिल व्यवस्थापन व जमिन खरेदीदार यांच्यातील दिनांक ०८.०३.२००५ च्या त्रिपक्षीय करारानुसार ठरल्याप्रमाणे सर्व कामगारांना रक्कम अदा करण्यात आली आहे. मुंबई औद्योगिक संबंध कायदा १९४६ मधील कलम २५ (ओ) नुसार शासनाने लक्ष्मी-विष्णू मिलची आस्थापना बंद करण्यास परवानगी दिली आहे. सोलापूर शहरातील लक्ष्मी-विष्णू या मिलसह भाडेकरुचा ताबा असलेल्या व ०१.०३.१९७८ रोजी अस्तित्वात असलेल्या जुन्या मिलच्या चाळी किंवा चाळ सदृश्य धोकादायक इमारतीच्या पुनर्बांधकामाबाबत वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याबाबत सोलापूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ३१.६ (ब) मध्ये नगरविकास विभागामार्फत आवश्यक सुधारणा दिनांक ०४.०३.२०१४ च्या अधिसुचनेन्वये करण्यात आली आहे. तथापि, गिरणी कामगारांना घरे देण्याबाबतची स्वतंत्र तरतूद सोलापूर विकास नियमावलीत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

आमगाव (जि.गोंदिया) देवरी, सालेकसा येथे शासकीय मुलींचे वसतीगृह सुरु करण्याबाबत

u

(22) * u३५३७६ uuश्री.संजय पुराम (आमगाव)व:व सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) आमगाव, देवरी, सालेकसा (जि.गोंदिया) येथे शासकीय मुलींचे वसतीगृह सुरु करण्याबाबतचे निवेदनन स्थानिक लोकप्रतिनिधी (आमगाव) यांनी मा.सामाजिक न्याय मंत्री यांना दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर निवेदनावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने उपरोक्त ठिकाणी मुलींचे वसतीगृह सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कधीपर्यंत कार्यवाही करणे अपेक्षित आहे ?

श्री. राजकुमार बडोले : (१) आमगाव, देवरी, सालेकसा या

तालुक्यांमध्ये मागासवर्गीय मुलामुलींचे शासकीय वसतिगृह सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १०.०२.२०१५ रोजी निवेदन दिले आहे.

(2) व (३) उपरोक्त ठिकाणी वसतिगृह सुरु करण्याच्या आवश्यकतेबाबतचा अहवाल आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे कडून मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

राज्यातील आदिवासी वसतीगृहांमध्ये पुरविण्यात आलेल्या सोलार वॉटर हिटरमध्ये झालेली अनियमितता

u

(23) * **u३६०८३ uuश्री.हरीभाऊ जावळे (रावेर)र:र** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातीललआदिवासी विकास विभागाच्या वसतीगृहामध्ये पुरविण्यात आलेल्या सोलार वॉटर हिटर मध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झाल्याचे तसेच पुरविण्यात आलेले वॉटर हिटर कार्यरत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,सविलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) शासकीय आश्रमशाळा तसेच वसतीगृहात पुरविण्यात आलेले सोलार वॉटर हिटर पैकी काही सोलार वॉटर हिटर कार्यरत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आलेली आहे.

(2) सदर प्रकरणी चौकशीसाठी दि. १६/०४/२०१४ च्या शासन निर्णयान्वये सचिव व विभागीय चौकशी अधिकारी (१), सामान्य प्रशासन विभाग यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचे कामकाज सुरु आहे.

(3) व (४) सदर चौकशी समितीचा अहवाल अदयाप अप्राप्त आहे.

राज्यात जातीचे बोगस दाखले देऊन आदिवासींच्या राखीव जागा बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत

u

(24) * u३२९५४ uu**डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी)**ी:ी सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यात शासनाच्या सेवेत जातीचे बोगस दाखले देऊन आदिवासींच्या राखीव जागा बळकावणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याचा निर्णय नुकताच शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच बोगस प्रमाणत्राव्दारे आदिवासींच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द राज्यातील आदिवासी क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार आदिवासींच्या जागेवर बेकायदेशीरपणे कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे जागेवर आदिवासींची पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (2), (3), (4) व (५)

uuuu दि.१५.६.१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण देण्याबाबतच्या मागणीचा विचार करण्यासाठी दि.४.३.२०११ च्या शासन

निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या मंत्रीगटाचा अहवाल प्राप्त झाला आहे.

दिनांक १५.६.१९९५ नंतर दिनांक १७.१०.२००१ पर्यंत, या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ा ज्या कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, अशा कर्मचा-यांना मंत्रीगटाच्या अहवालावर शासनाचा पुढील निर्णय होईपर्यंत, शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये अथवा त्यांच्या ा सेवा समाप्त करण्यात येऊ नये, अशा सूचना दि. २१.१०.२०१५ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

uuuuu सदर परिपत्रकास विरोध दर्शविणारी निवेदने लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाली आहेत.

मंत्रीगटाच्या अहवालामधील शिफारशीसंदर्भात निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

u

सोलापूर जिल्ह्यातील सात हजार कापड व सुतगिरणी कामगारांना घरे मिळण्याबाबत

(25) * u२८९३४ uuश्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण)ण:ण

सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) सोलापूर जिल्ह्यातील ७ हजार कापड व सुतगिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून अर्ज मागविले गेले असून अद्याप या कामगारांना घरे मिळवून देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून कामगारांना घरे मिळवून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही.

कापड व सुतगिरणी कामगारांना घरे मिळवून देण्यासंदर्भात शासनाकडून कोणतेही अर्ज मागविण्यात आलेले नाहीत.

(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर, वर्धा व बुलढाणा या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंकांना अतिरीक्त अर्थसहाय्य देण्याबाबत

(26) * u३२२९५ uuडॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक)क:क सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) नागपूर, वर्धा व बुलढाणा या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकांना १४५ कोटी ९ लाख रुपयांचे अतिरीक्त अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी घेतला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यापुर्वी मार्च, २०१५ मध्ये शासनाने या ३ बॅकांना ३७९ कोटी ९७ लाख रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत केले होते, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या बॅकांना बॅकिंग परवाना मिळावा यासाठी हे अर्थसहाय्य देण्यात आले, हे खरे आहे काय, तसेच या बँकांना देण्यात आलेले अर्थसहाय्य किती कालावधीसाठी व कोणत्या स्वरुपात देण्यात आले आहे,

(4) असल्यास, उक्तत बँकांना देण्यात आलेला निधी शासनास परत मिळाला नाही तर शासन काय कार्यवाही करणार वा करीत आहे,

(5) असल्यास, या बँकांना बँकिंग परवाना रद्द होण्याची स्थिती निर्माण होण्यास जबाबदार अधिकारी व संचालक यांचेवर शासनाने कोणती कारवाईई केली वा करण्यात येतत आहे, नसल्यास कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(6) तसेच, उक्त बॅकाप्रमाणेच अन्य बॅकांनाही अर्थसहाय्य देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे. असा शासन निर्णय दि. २७/१०/२०१५ रोजी निर्गमित झालेला आहे.

(2) होय, हे खरे आहे.

(3) होय, तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना बँक परवाना प्राप्तीसाठी ७ % भांडवल पर्याप्तता प्राप्तत करण्यासाठी अर्थसहाय्य दिले आहे. अर्थसहाय्यांच्या योजनेनुसार बँकांना राज्य शासन हिश्श्याची रक्कम रु. ३५.५० कोटी भागभांडवल म्हणून व उर्वरित रक्कम रु. ३४४.४७ कोटी अनुदान म्हणून अदा करण्यात आली आहे. यापैकी भागभांडवलाची परतफेड बँकांनी पुढील दहा वर्षात समान हप्त्यात करावयाची आहे. अर्थसहाय्यांच्या योजनेनुसार बँकांनी दि.३१.३.२०१७ पर्यत विहीत अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(4) या प्रकरणी तीन्ही बँकांची मालमत्तांची विक्री करुन सदर रक्कम शासकीय भागभांडवलाच्या विमोचनासाठी शासनास परत करावयाची आहे. तसेच या बँकांनी त्यांच्या अनुत्पादक मत्तेपोटी (NPA) वसुल केलेल्या रकमेच्या ५०% रक्कम शासकीय भागभांडवलापोटी शासनासस करावयाची आहे.

(5) नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत झालेल्या सन २००१-०२ मधील रु. १५३ कोटी रोखे खरेदी गैरव्यवहाराबाबत पाच कंपन्या व त्यांच्या संचालकांविरुध्द दि. २५.०४.२००२ रोजी फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणी बँकेचे संचालक मंडळ देखील बरखास्त करण्यात आले होते. तसेच संबंधीत कंपन्यांवर कलम १३८ अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. सदर रकमेमुळे बँकेस झ ालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करुन नुकसानीची रक्कम वसुल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम ८८ अंतर्गत चौकशी देखील सुरु आहे.

uuuuuu बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेप्रकरणी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये सन २००४ मध्ये बँकेची चौकशी ी करण्यात आली आहे. तसेच कलम ८८ अन्वये सन २००८ मध्ये चौकशी होऊन त्यानुसार बँकेचे संचालकांना दोषमुक्त ठरविण्यात आले आहे. त्यानंतर सन २००९ मध्ये पुन्हा कलम ८८ अन्वये चौकशी आदेश काढण्यात आले होते. सदर आदेश मा. मंत्री (सहकार) यांनी दिनांक १६.३.२०११ रोजी खारीज केले आहेत. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे दि. ३०.१२.२०१३ च्या आदेशान्वये कलम ८१(३) नुसार टॉप २० थकीत बिगरशेती कर्ज प्रकरणांचे चाचणी लेखापरिक्षण करण्याचे आदेश पारीत करण्यात आले. सदर

आदेशाविरुध्द मा. मंत्री (सहकार) यांचेसमोर कलम १५४ अन्वये पुर्नरिक्षण अर्ज दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी शासन स्तरावर दि. ०२/०९/२०१५ रोजी सुनावणी झाली असून कार्यवाही चालू आहे.

(6) बँकीग परवाना मिळण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय अर्थसहाय्य देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(7) प्रश्न उद्भवत नाही.

अप्पर आदिवासी आयुक्त, कार्यालय नागपूर यांना प्राप्त झालेला ३२ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

u

(27) * u३६२२७ uu**श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य)य:य** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) आदिवासींच्या विकासाकरीता अप्पर आदिवासी आयुक्त, कार्यालय नागपूरला केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली असून सन २००८ ते २०१५ या कालावधीत मिळालेल्या निधीपैकी ३२ कोटी रुपयांचा निधी अखर्चित असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, हा निधी आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरीता दिला जात असून त्यात आदिवासी शेतक-यांना विहीरी, बैलजोडी, बैलबंडी, सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगारासाठी, महिला बचत गटांना स्वयं:रोजगार व उद्योगासाठी अर्थसहाय्य म्हणून दिला जातो, परंतु सन २००८ पासून या योजना राबविण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या योजनेसाठी आलेल्या निधीपैकी ३२ कोटी रुपयांचा निधी अखर्चित असून त्या संदर्भात पत्रव्यवहार केल्यानंतर अधिका-यांकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(4) असल्यास, आदिवासींच्या विकासाकरीता शिल्लक असलेला ३२

कोटी रुपयांचा अखर्चित निधी आदिवासींच्या कल्याणकरीता न राबविणा-या अधिका-यांच्या कामांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) होय, अंशत: खरे आहे.
(2) हे खरे नाही,
सन २००८ पासून प्राप्त केंद्रीय निधीपैकी बहुतांशी निधी आदिवासीसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्यात आला असून उर्वरित निधी खर्च करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(3) हे खरे नाही.
या संदर्भात अपर आयुक्त, नागपुर कार्यालयास कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झालेला नाही.
(4) व (५) योजना राबविण्याची कार्यवाही सुरु असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ मधील बागायती क्षेत्र भूसंपादनातून वगळणेबाबत

(28) * u२८६९९ uuश्री.सुरेश गोरे (खेड आळंदी)ी:ी सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ मध्ये` असलेल्या जमिनी बागायती क्षेत्रात असूनही शेतकऱ्यांच्या ७/१२ वर MIDC ने भूसंपादनासाठी राखीव असा शेरा टाकला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर शेरा टाकण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना जमिनीवर विकास करणे, कर्ज न मिळणे अशा अडचणी होत असल्यामुळे सदर बागायती क्षेत्र वगळण्यात यावेत याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने मा. उद्योग मंत्री यांस दि. २१ ऑक्टोबर २०१५ रोजी निवेदन दिले, हे`खरे आहे काय,
(3) असल्यास उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर बागायती क्षेत्र वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) हे खरे आहे.
(2) व (३) चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ मधील बागायती क्षेत्र वगळण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(4) प्रश्न उद्भ्वित नाही.

सातारा येथे जिजामाता बँकेत झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

(29) * u३०३७१ uuश्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर)र:र सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) सातारा येथे जिजामाता बँकेत झालेल्या कथित अनियमिततेची चौकशी करण्यासाठी सहकार जिल्हा उपनिबंधक यांनी चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून या चौकशीत आठ व्यवहारांची चौकशी होणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर चौकशी निर्धारित वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.
(2) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्या दि. २४.०८.२०१५ च्या आदेशान्वये सहाय्यक निबंधक, मेंढा ता.जावली यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
uuuu प्राधिकृत अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८८,९५ मधील तरतुदीन्वये जबाबदार व्यक्तींची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दि.०३.११.२०१५ व दि. ०९.११.२०१५ रोजी दिले आहेत.
(3) प्रश्न उद्भ्वित नाही.

---

u

जयभवानी साखर कारखाना लि., गेवराई (जि.बीड) या साखर कारखान्याने कर्मचा-यांचे थकित वेतन, भविष्य निर्वाह निधी व इतर देणी कामगारांना न दिल्याबाबत

u

(30) * u३४२२७ uu**श्री.लक्ष्मण पवार (गेवराई)ई:ई** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जयभवानी साखर कारखाना लि., गेवराई, (जि.बीड) या साखर कारखान्याने कर्मचा-यांचे माहे जुलै २००४ ते ऑक्टोबर २००५, माहे सप्टेंबर २०१२ ते ऑक्टोबर २०१४, एप्रिल २०१५ ते सप्टेंबर २०१५ असे एकूण ४८ महिन्यांचे थकित वेतन, भविष्य निर्वाह निधी, सेवा निवृत्ती झालेल्या कर्मचा-यांना अंतिम पगार व ग्रेज्यूईटी, १८ टक्के वेतनवाढ व इतर देणी कामगारांना दिलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, कामगारांची पगारवाढ रक्कम कामगारांना न देता। तसेच त्यांची संमती न घेता सदर रक्कम शारदा प्रतिष्ठानला परस्पर वर्ग केली, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शेतक-यांचे उसाचे शासनाचे हमीभाव २२५० रुपये प्रतिटन न देता ११२० रुपये प्रतिटन दर देण्यात आलेल्या फरकाची रक्कम शेतक-यांना देण्यातत यावी, शेतक-यांना उसाचे देयक न दिल्याने शासनाने चौकशी करून कारवाई करावी, आवश्यकतेनुसार कारखान्याकडील साखर जप्त करून शेतक-यांचे, कर्मचा-यांचे देयक देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, शेतक-यांची ऊसाचे देयक व कर्मचा-यांचे वेतन न देणा-या जयभवानी साखर कारखाना लि., गेवराई, जि.बीडचे संचालक मंडळ शासन बरखास्त करतील काय, तसेच शेतक-यांची व कर्मचा-यांची हेळसांड करणा-या संचालक मंडळावर कोणती कायदेशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय. कारखान्याचे कर्मचाऱ्यांचे पगार ग्रॅज्यूईटी थकीत आहे. १८% वेतन वाढ व अंतरीम वाढ दिलेली नाही.

(2) नाही.
(3) कारखान्याने गाळप हंगाम २०१४-१५ मध्ये २८११०१मे.टन ऊसाचे गाळप केले आहे. कारखान्याची हंगाम २०१४-१५ ची एफ.आर.पी रु. २२००/-प्र.मे.टन आहे. तोडणी वाहतुक खर्च रु. ५८३.८१/- प्र.मे.टन वजा जाता निव्वळ एफ.आर.पी. रु. १६१६.१९/- प्र.मे.टन आहे. कारखान्याने २४३११४ प्र.मे.टनास रु. १५००/- रुपये प्रमाणे रु. ३६४३.७१लाख अदा केले आहेत आणि ३७९८७/- प्र.मे.टनास रुपये ११२०/- प्र.मे.टनाप्रमाणे रु. ४२५.४५ लाख अदा केले आहेत थकीतत एफ.आर.पी. रक्कम रु. ४७०.९४ लाख अदा करणे बाकी आहे.
(4) नजीकच्या काळात निधी उपलब्धतेनुसार पगार देणेबाबत प्रातिनिधीक कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी विचार विनियम करुन मार्ग काढीत असल्याबाबत कारखान्याने कळविले आहे.

सदर ऊस बिलाची रक्कम थकीत असल्यामुळे ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार आर.आर.सी प्रस्तावित आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आश्रमशाळांतील विदयार्थी शालेय साहित्यापासून वंचित राहिल्याबाबत

u

(31) * u२८३१९ uuश्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल

राऊत (विक्रोळी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण)ण:ण सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यातील विशेषत: ठाणे, रायगड, नाशिक, बुलढाणा, पुणे जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना गेल्या तीन महिन्यांपासून अंडी, केळी, दूध, गणवेश, बूट, शालेय साहित्य तसेच जीवनावश्यक वस्तू पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील पाचही आदिवासी विकास विभागांना अतिरिक्त आयुक्त यांनी उपरोक्त प्रकरणी निविदा काढण्याचे आदेश दिले असतानांही सदर सुविधा अद्याप देण्यात आल्या नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून मा.मुख्यमंत्री महोदयांनी सन २०१५-१६ करिता २ लाख बूट वाटपाचे काम संत रोहिदास महामंडळाला शासन दरकरारानुसार देण्याचे आदेश दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास दिले असतानाही अद्याप बूट वाटप करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(4) तसेच आतापर्यंत चारवेळा गणवेश खरेदीची निविदा काढण्यात येऊनही अद्यापी अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(6) उक्त आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(7) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) व (२) हे खरे नाही.
राज्यातील शासकीय आश्रमशाळांना पुरविण्यात येणारा पौष्टीक आहार अंडी, दुध, केळी इ. साठी अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती यांचे स्तरावर ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असून त्यास वित्तीय प्रक्रीया राबविण्यात आली असुन त्यास वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. अपर आयुक्त, नागपूर यांचे स्तरावर याबाबत पुननिविदेची कार्यवाही सुरु आहे.
uuuu गणवेश कापड खरेदी बाबत आयुक्त, आदिवासी विकास याचे मार्फत दोन वेळा निविदा प्रसिध्द केल्या दोनही वेळेस स्पेसिफीकेशन प्रमाणे नमुने पात्र ठरले नाहीत त्यामुळे तीसऱ्यांदा ई निविदा राबवून दिनांक ०७/११/२०१५ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेत.
uuuu बुट खरेदीबाबत आयुक्तालय स्तरावर ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आली असून बूटांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. शैक्षणिक साहित्याबाबतीत मुख्याध्यापक व गृहप्रमुख/गृहपाल यांचे स्तरावर खरेदी करण्यात आली आहे. तसेच अन्नधान्य, कडधान्य व किराणामाल खरेदी करुन पुरवठा आदेश देणेची कार्यवाही सुरु आहे.
(3) संत रोहिदास महामंडळाला दिनांक २६/०५/२०१५ नुसार पुरवठ्यांचे आदेश देण्यात आले होते. तथापि सदर संस्थेने मुदतीत पुरवठा न केल्याने दिनांक १६/०७/२०१५ रे ाजी सदर आदेश रद्द करण्यात आले . त्यानंतर बुट खरेदीसाठी आयुक्तालय स्तरावरुन ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात येवून बुटांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. तपासणी अहवालानुसार निविदा अंतिम करुन पुरवठा आदेश देण्यात येणार आहेत.
(4) हे खरे नाही.
uuuu आयुक्तालय स्तरावरुन दिनांक ०७/११/२०१५ रोजी ई-निविदेतील न्युनतम दर धारकास गणवेशाच्या कपड्यांचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.
(5) प्रश्न उद्भ ावत नाही.
(6) मुख्याध्यापक/गृहप्रमुख यांचे स्तरावर शैक्षणिक साहित्याची खरेदी करण्यात आली आहे. इतर जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा प्रकल्प अधिकारी स्तरावर करण्यात आलेला आहे.
(7) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) येथील हातदे-मिळंद या गावाला जोडणारा साकव धोकादायक असल्याबाबत

u

(32) * u३५२०५ uu**श्री.राजन साळवी (राजापूर)र:र** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राजापूर तालुक्यातील (जि.रत्नागिरी)येथील हातदे-मिळंद या गावाला जोडणारा साकव अत्यंत धोकादायक झाला असून साकवावरुन विदयार्थी,ग्रामस्थांना प्रवास करणे धोकादायक होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी अनेक वेळा मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार करुन सुध्दा अदयापही शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने उक्त कामासाठी निधीची तरतुद केली आहे काय,

(4) नसल्यास,स विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय,

(2), (3) व (४) सन u२००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिरक्षण व दुरुस्ती या योजनेत्तर संवर्गाखाली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतू तदनंतर सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

uuuuuu सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची uदेखभाल दुरुस्ती हा योजनेत्तर कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.शासन निर्णय दि .१०.९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विषद केली आहे.त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप uरस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते . त्यानुसार u रत्नागिरी uजिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ uकि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत uसन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष , तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३,२०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु. ७६३.५८ लक्ष uतर uपूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी uजिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

---

u

राज्यातील विशेषत: धुळे, नाशिक व नंदुरबार या जिल्ह्यांतील आदिवासी विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश मिळण्याबाबत

(33) * **u२९३६४ uuश्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव)व:व** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यातील विशेषत: धुळे, नाशिक व नंदुरबार या जिल्ह्यांतील आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आदिवासी वसतीगृहात प्रवेश मिळण्यापासून बरेच विद्यार्थी वंचित राहिल्याचे माहे` सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त जिल्ह्यांतील आदिवासी ी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या मान्य करण्याबाबत विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(4) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) धुळे, नाशिक, नंदुरबार या जिल्ह्यांत आदिवासी ी विकास विभागाची १४२ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची मंजूर प्रवेश क्षमता १८,४७० इतकी असून सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात सदर जागा भरण्यात आल्या आहेत. सदर जिल्ह्यात वसतीगृह प्रवेशासाठी ६,८८४ अर्ज प्रलंबित आहेत.

(2) सदर जिल्ह्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन केलेले नाही.

uuuu मात्र, नाशिक शहरातील शासकीय आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहात प्रवेशाकरीता प्रवेश क्षमता वाढवून मिळण्याकरीता विद्यार्थ्यांनी दि. ०८.०९.२०१५ रोजी आयुक्त कार्यालय, नाशिक येथे आंदोलन केले होते.

(3) व (४) नाशिक विभागातील आदिवासी शासकीय वसतीगृहात प्रवेशासाठी अधिक प्रमाणात प्रवेश अर्ज प्राप्त होते असल्याने नागपूर, ठाणे व अमरावती या प्रादेशिक विभागातील वसतीगृहातील रिक्त जागांचा आढवा घेऊन अतिरिक्त जागा तात्पुरत्या ा स्वरुपात वर्ग करण्याबाबत संबंधित अपर आयुक्तांना निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासकीय वसतीगृहाकरीता क्षमतावाढीचा एकत्रीत प्रस्ताव माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये मागविण्यात आला आहे.

हदगांव (जि.नांदेड) येथील शासकीय वसतिगृहातील मुली अस्वच्छतेमुळे आजारी पडत असल्याबाबत

u

(34) * u३३९९६ uuश्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे)``: सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1)1 हदगांव (जि. नांदेड) येथील मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृहातील भोजन, पाणी, ड्रेनेज, दुर्गंधी, अस्वच्छता इ. मुळे

वर्षभरापासून दररोज दोन ते तीन मुली आजारी पडत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2)असल्यास,या वसतिगृहातील अन्न,पाणी,स्वच्छता इ.चौकशी करून त्याचा दर्जा तपासण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?त

श्री. राजकुमार बडोले : (१) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

धुळे जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहातील त्रुटींबाबत

u

(35) * u२८९६५ uuश्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) I: I सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) धुळे जिल्हयात समाजकल्याण विभागाच्या १०७ वसतीगृहापैकी साक्री व शिरपूर वसतीगृह अ आणि ब गटात आहेत तर उर्वरित सर्व वसतीगृह हे क व ड श्रेणीत असल्याचे समाजकल्याण विभागाने जाहिर केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान झालेल्या तपासणीत सर्व १०७ वसतीगृहांमध्ये गंभीर त्रुटया आढळून आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या मुलांना अभ्यासापेक्षा सुविधाअभावी बऱ्याचवेळी आंदोलने करावी लागतात, म्हणूनच धुळे येथील समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी धुळे यांच्या निवासस्थानी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) नाही.
(2) दि.१३.०८.२०१५ रोजी झालेल्या तपासणीमध्ये किरकोळ त्रुट्या निदर्शनास आल्या.
(3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह चंदननगर, धुळे या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वसतिगृहाबाहेरील मुलांनी मारहाण केल्यामुळे वसतिगृहाचे विद्यार्थी जिल्हाधिकारी, धुळे यांचे निवासस्थानी गेले होते.
(4) जिल्हाधिकारी धुळे यांनी चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली. सदर समितीने काही सोयी-सुविधांच्या अभावामुळे वस्तीगृहांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची शिफारस केली आहे. त्यामुळे वसतिगृहास दिल्या जाणारे अनुदानातून दंडाची रक्कम कपात करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील बंद पडलेले लघु उद्योग सुरू करण्याबाबत

u

(36) * **u२८८२७ uuॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर)रःर** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) राज्यात विविध अडचणींमुळे मागील पाच वर्षापासून लघु आणि मध्यम असे तब्बल ७२ हजार ५८७ उद्योगधंदे बंद पडले आहेत, त्यामुळे सुमारे तीन लाख कामगार बेरोजगार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, बंद असलेले उद्योगग पुन्हा सुरु कसे होतील याबाबत अभ्यास करण्याकरिता एक अभ्यासगट स्थापन करण्याचा प्रस्ताव

शासनाच्या विचाराधीन आहे तसेच राज्य सरकारने लघु उद्योगासाठी विशेष अभय योजना राबवूनही उद्योग बंद पडत आहेत, हे ही खरे काय,

(3) असल्यास, उक्त बंद पडलेल्या उद्योगांना पुनरुज्जीवन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली ी वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) उद्योग संचालनालयाच्या जिल्हास्तरावरील अभिलेख्यानुसार सन २००८ मध्ये करण्यात आलेल्या ४ थ्या औद्योगिक प्रगणनेच्या ा अहवालानुसार राज्यामध्ये ३०५५२ लघु उद्योग व ७०६८ मध्यम उद्योग बंद पडलेले आहेत.

uuuuu शासन निर्णय क्रमांक एसआयसी २००७/(०१/०७) उद्योग-१०, दिनांक ३०/०३/२००७ अन्वये जिल्हास्तरावर शुश्रुषा कार्यक्रमांतर्गत बंद उद्योग पुन्हा सुरु होऊन कामगार बेरोजगार होणार नाहीत याची दक्षता घेतली जाते.

(2) नाही.

(3) महाराष्ट्र औद्योगिक धोरण, २०१३ नुसार पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद घटकांसाठी शासन निर्णय दिनांक १४/०८/२०१४ अन्वये uविशेष अभय योजना ा लागू करण्यात आली होती. त्या योजनेचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत कार्यरत होती.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही. ी

मुंबईतील एलफिन्स्टन उड्डाणपूलाखालची जागा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने परस्पर इंडिया बुल्सच्या मे. स्टोअर वन रिटेल इंडिया लि. कंपनीला दिल्याबाबत

(37) * u२९६६२ uuश्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम)म:म सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मुंबईतील एलफिन्स्टन उड्डाणपूलाखालची जागा महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता परस्पर इंडिया बुल्सच्या मे. स्टोअर वन रिटेल इंडिया लि.

कंपनीला । सुशोभिकरणासाठी देऊन टाकली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर पुलाखालची जागा रस्ते विकास मंडळाला एक रुपये भाड्याने दिली असताना त्या । जागेचा करार मंडळाला अधिकार नसतानाही इंडिया बुल्स सोबत २०१४ साली ६५ लाख रुपयांचा । केल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर जागा सुशोभिकरणासाठी दिल्यामुळे उड्डाणपूला शेजारी असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना रस्त्याच्या पलिकडे जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याने सदर जागा सुशोभिकरणासाठी देण्यात येवूनये अशी मागणी स्थानिक आमदारांनी वव स्थानिक रहिवाशांनी कडाडून विरोध करत केली असल्याची बाब दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, उड्डाणपूलाच्या खाली खुल्या असलेल्या जागा बंद करुन त्या खाजगी विकासकाला सुशोभिकरणासाठी देण्याची कारणे काय आहेत व स्थानिक रहिवाशांचा विरोध लक्षात घेऊन आतापर्यंत एमएसआरडीसीने काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.
uuu प्रश्नाधीन उड्डाणपुल हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास uमहामंडळाने बांधलेला असून, बृहन्मुंबईतील महामंडळाने बांधलेल्या उड्डाणपुलांकरीता शासनाने महामंडळास uउद्योजकक म्हणून घोषित uकेलेले आहे. उड्डाणपुल सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा मुंबई uमहानगर पालिकेच्या रस्त्यावर असले तरी उड्डाणपुलाखालील जागेचा व्यापारी तत्त्वावर वापर करण्याचा व जाहिरीतीद्वारे उत्पन्न घेण्याचा अधिकार महामंडळास देण्यात आला आहे. त्यामुळे मे.स्टोअर वन रिटेल इंडिया लि कंपनीला सुशोभिकरणासाठी जागा देण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेण्याचा प्रश्न उदभवत नाही.
(2) उड्डाणपुलाखालील जागेचा व्यापारी तत्वावर वापरकरणे` व जाहिरातीद्वारे उत्पन्न घेण्याबाबत महामंडळास देण्यात आलेल्या अधिकारानुसार, प्रश्नाधीन
उड्डाणपुलाखालील जागा मे.स्टोअर वन रिटेल इंडिया लिमिटेड या कंपनीस फक्त सुशोभिकरणासाठी, विहीत कार्यपद्धती अवलंबून व विहीत अटी शर्तींवर ११ वर्षाच्या कालावधीकरीता रू.६१ लाख एवढया

एकरकमी आगाऊऊ मोबदला रकमेवर दि.०७.०१.२०१५ च्या करारनाम्याने देण्यात आली आहे.

(3) स्थानिक रहिवाश्यांना त्यांच्या इमारतीच्या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था नसल्याने, उड्डाणपुलाखाली पार्किंग करू देण्याबाबत कार्यवाही करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१४.९.२०१५ च्या निवेदनाद्वारे महामंडळास केली होती. परंतु सुरक्षितेतेच्या दृष्टीकोनातून उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद करण्याचा धोरणात्मक निर्णय महामंडळाने घेतला असून अशाच प्रकारचा आदेश मा.उच्च न्यायालयाने सुध्दा पारीत केला असल्याने सदर निवेदनाचा महामंडळाने विचार केलेला आहे.

(4) उड्डाणपुलाखालील जागेचा अनधिकृत वापर, अतिक्रमणे टाळण्यासाठी, तसेच उड्डाणपुलाची सुरक्षितता आणि शहराच्या सौंदर्यामध्ये वाढ करण्यासाठी प्रश्नाधीन उड्डाणपुलाच्या खालील खुली जागा खाजगी विकासकाला सुशोभिकरणासाठी देण्यात आलेली आहे.

मौजे वाघापूर (ता.जि.यवतमाळ) येथील संभाजीनगर मधील आदिवासी वसतिगृहाची दयनीय अवस्था झाल्याबाबत

u

(38) * u३५१७९ uuश्री.मदन येरावार (यवतमाळ)ळ:ळ सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांकरीता सर्व सुविधांसह शिक्षण मिळावे याकरीता आदिवासी वसतिगृहांना मंजुरी दिली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यवतमाळ जिल्हयातील आदिवासी वसतिगृह हे भाडयाच्या इमारतीत असून मौजे वाघापूर (ता.जि.यवतमाळ) येथील संभाजीनगर मधील आदिवासी वसतिगृह रुपनार सभागृहात असून विद्यार्थ्यांची संख्या २५० आहे. या विद्यार्थ्यांना राहण्यासाठी पुरेशा खोल्या नसून एका हॉलमध्ये निवासी व्यवस्था करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, संभाजी नगर येथील वसतीगृहामध्ये निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, झोपण्याकरीता गाद्या व शौचालयाची अतिशय दयनिय अवस्था आहे, याबाबत विद्यार्थ्यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी विविध मागण्यांचे निवेदन मा.जिल्हाधिकारी यांना दिले, हेही खरे आहे काय,

(4) असल्यास, शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेतत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

(3) जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे.

(4) सदर वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या मागण्यांनुसार वसतीगृहातील भोजन ठेका बदलण्यात आला असून पाण्याची व्यवस्था दोन स्वंतत्रर बोअरवेल द्वारे करण्यात आली आहे. वसतीगृहातील शौचालयांची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच सदर विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(5) प्रश्न उद्भ्वित नाही.

राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या भागात मनेरवारलू व महादेव कोळी समाजाला जात वैधता प्रमाणपत्र मिळणेबाबत

u

(39) * **u३२२३५ uuश्री.सुभाष साबणे (देगलूर)र:र** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील विशेषत: मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील देगलूर, बिलोली व मुखेड या भागात मनेरवारलू व महादेव कोळी ही जात शासनाच्या अनुसूचित जमाती या प्रवर्गामध्ये समाविष्ट असून या समाजाच्या व्यक्तींना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात येत नसून शासनाने गेल्या काही वर्षापासून अचानकपणे जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे बंद करण्यात आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यामुळे` या जमातीतील विद्यार्थ्यांना व कर्मचा-यांना शैक्षणिक व इतर सवलती व सुविधा मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,य

(3) असल्यास, या जमातीला जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(4) असल्यास, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(5)5 नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.
uuuuuu शासनाने, uमहाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ तयार केलेले आहेत. त्यामधील नियम ३(३) व ३(४) मधील तरतुदीनुसार कागदपत्रांची पूर्तता करणा-या अर्जदारास सक्षम प्राधिका-यांकडुन अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात येते.` तसेच नियम ११ मधील तरतुदीनुसार नमूद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणा-या व्यक्तीस/अर्जदारास अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळते.
uuuuuuu तसेच उक्त नमूद अधिनियम २००० मधील कलम ८८ नुसार अनुसूचित जमातीचे फायदे घेणा-या अर्जदाराने तो ज्या जमातीचे किंवा वर्गाचे आहेत हे सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तीवर असते.
(2), (3), (4) व (५) प्रश्न उद्भवत नाही.
uuuuuuuuuu

अकोला जिल्हयातील (ता.अकोला) राज्य महामार्गांची झालेली दुरावस्था

u
(40) * u३५१२५ uuश्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम)म:म सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) अकोला जिल्ह्यातील (ता.अकोला) येथीलल पावसाळा सुरु होण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फे रस्त्यांच्या दुतर्फा पाण्याचा निचरा होण्यासाठी करण्यात येणारे स्क्रॅपींग आणि ड्रेनेजिंगचे काम गेल्या अनेक वर्षांपासून न केल्याने राज्य महामार्गांची अवस्था अत्यंत खराब झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्यामुळे रस्त्यांवर मोठया

प्रमाणात खड्डे निर्माण झाले असून त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरहू राज्य महामार्गांची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(4) असल्यास, तातडीने या राज्यमार्गांची दुरुस्ती करुन रस्त्यांच्या दुतर्फा पाण्याचा निचरा होण्यासाठी करण्यात येणारे स्क्रॅपींग आणि ड्रेनेजिंगचे काम करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. चंद्रकांत पाटील : (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
रस्त्यावरील पाण्याचा निचरा होण्यासाठी साईड पट्टया तासाण्याचे व गटारी खोली करण्याची अत्यावश्यक कामे करण्यात आली आहेत, तसेच वाहतूक सुरुळीत ठेवण्याच्या दृष्टीने खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहे. तसेच रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यामुळे अपघात झाले नसल्याचे पोलिस अहवालावरुन दिसून येते.
(3) व (४) निधी, निकष, मंजुरी व प्राथम्याने प्रश्नांकित रस्त्यांच्या दुरुस्तीची, तसेच उर्वरित, साईड पट्टया तासणे व गटारली खोली करण्याची कामे आवश्यकतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(5) प्रश्नच उद्भ ावत नाही.

---

u

गडचिरोली जिल्ह्यातील मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील शिक्षकांना मानधन मिळाले नसल्याबाबत

u
(41) * u३५०३८ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा) T: T सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) गडचिरोली जिल्ह्यातील ६० मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील शिक्षकांना मागील वर्षभरापासून मानधन मिळाले नसल्याबाबतचे निवेदन या शिक्षकांनी निवासी जिल्हाधिकारी यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने या शिक्षकांना त्यांचे थकित मानधन देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3)3 नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. राजकुमार बडोले : (१) होय.
(2) उपरोक्त निवेदन दिल्यानंतर मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचे जानेवारी, २०१५ पर्यतचे मानधन अदा करण्यात आले आहे. उर्वरित महिन्यांचे मानधन अदा करण्यासाठी निधी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

आंबेघर (ता.भोर,जि.पुणे) येथील नीरा नदीवरील पुलाच्या कठड्यांची दुरुस्ती करण्याबाबत

u

(42) * u३०३७७ uuश्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली)ी:ी सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) पुणे जिल्ह्यातील (ता.भोर) येथील भोर-महाड रस्त्यावरील आंबेघर येथील नीरा नदीवरील पुलावरुन चारचाकी गाडी खाली नदीपात्रात पडून एकाच कुटंबातील पाच जण मृत्यूमुखी पडले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या दुर्घटनेला सहा महिने उलटले तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदरहू पुलाच्या कठड्यांची दुरुस्ती करण्यात आली नसल्याने भविष्यात आणखीही दुर्घटना घडू शकतात हे पाहता सदर कठड्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे आहे.
uuuu तथापि, सदर अपघातग्रस्त वाहन नीरा नदी पुलावरील संरक्षक कठड्यांना धडकल्यामुळे नदीपात्रात पडलेले नसून वाहनचालकाच्या

चुकीमुळे पुलाच्या डावीकडील पोहोचमार्गावर असलेल्या बाजुपट्टीवरूनन रस्त्याच्या बाहेर गेल्यामुळे नदीपात्रात पडलेले आहे.

(2) सद्यस्थितीत प्रश्नाधीन पुलाच्या दोन्ही बाजुकडीलल संरक्षक कठडे हे सुस्थितीत व सुरक्षित असून पुलाच्या दोन्ही बाजूंस दिशादर्शक फलक बसविण्यात आलेले आहेत.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय सहकार विकास निगमने (एनसीडीसी) राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योगातील सुधारणांसाठी आर्थिक मदत दिल्याबाबत

(43) * u२९४७६ uuश्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा) I: I सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) राज्यांच्या सहकार पणन व वस्त्रोद्योगातील सुधारणासाठी कर्ज स्वरुपात आर्थिक मदत देत असून त्यानुसार सन २०१४-२०१५ या वर्षासाठी तब्बल ११२ कोटी ८२ लाख रुपयांचे कर्ज राज्य सरकारला उपलब्ध करुन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) राज्य सरकारने व्याजासह कर्जाचे परतफेड करणे आवश्यक असतानाही ती सरकारने वेळेत न दिल्याने सहकार विकास निगमने पत्र पाठवून ११२ कोटी ८२ लाख रुपयांचे मुद्दल आणि ३७ कोटी १८ लाखांचे व्याज एकत्र देण्याची मागणी केली असता राज्य सरकारने केवळ मुद्दलांची रक्कम दिली असून कर्जावरील व्याजांचे ३७ कोटी १८ लाख रुपये राज्य सरकारने थकविले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सरकारच्या या थकबाकीमुळे भविष्यातील एनसीडीसीकडून सहकार व पणन विभागाला मिळणाऱ्या कर्जावर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(4)4 असल्यास, राष्ट्रीय सहकार विकास निगमने राज्य सरकारला कर्ज स्वरुपात दिलेल्या आर्थिक मदतप्रित्यर्थ देय असलेली व्याजांची रक्कम थकविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(5) असल्यास, एनसीडीसीच्या कर्जावरील व्याज देणेबाबत शासनाने

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१)१ राज्य शासनाच्या विविध योजनांकरिता राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) कर्ज स्वरुपात अर्थिक मदत देत असते.` मार्च २०१५ अखेर कर्जाच्या परतफेडीपोटी रुपये ११२.८२ कोटी ी व व्याजाच्या परतफेडीपोटी रुपये ३७.१८ कोटी इतकी रक्कम एनसीडीसीला देय आहे.`
(2) कर्ज परत फेडीची रक्कम रुपये ११२.८२ कोटी दिनांक १९/९/२०१५ च्या शासन निर्णयान्वये` विहित वेळेतत मंजूर करण्यात आली आहे.` तथापि, रुपये ३७.१८ कोटी इतकी व्याजाची रक्कम अदा केलेली नाही. ी
(3), (4), (5)5व (६) एनसीडीसी कडून प्राप्त होणा-या कर्जाच्या व्याजाचे दर जास्त असल्यामुळे परतफेड करण्याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय सुरु आहे.`

मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंत्याने पदभार सोडल्यानंतरही बेकायदेशीररित्या कामास मंजूरी दिल्याबाबत

(44) * u२९६५३ uuप्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे)`:` सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयाचे तत्कालीन अधीक्षक अभियंता श्री. सी.व्ही. तुंगे यांनी पदभार सोडल्यानंतरही बेकायदेशीररित्या कोट्यवधी रुपयांच्या कामास मंजुरी दिल्याबाबतची लेखी तक्रारर दिनांकक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास, श्री.चेतन पेडणेकर, श्री.प्रविण काकड इत्यादी सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र शासन यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, मे २०१५ मध्ये तत्कालिन अधीक्षक अभियंता श्री.सी.व्ही.तुंगे यांनी पदभार सोडल्यानंतर मंजुरी दिलेली कामे कोणती

व ती किती रुपयांची करण्यात येणार होती ? त्यापैकी किती कामांना सुरुवात करण्यात आली आहे,
(3) या सर्व प्रकाराची चौकशी पूर्ण झाली आहे काय तसेचश्री.सी.व्ही.तुंगे यांच्याविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?
u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.
uuuu प्रस्तुत प्रकरणी श्री.चेतन पेडणेकर यांची तक्रार श्री.प्रविण काकड यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ अन्वये प्राप्त केलेल्या कागदपत्रांसोबत शासनास दि. ०२.०९.२०१५ रोजी प्राप्त झाली आहे.
(2) व (३) तक्रारीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी अहवाल दि. २२.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये (APMC) एफडीचा झालेला गैरव्यवहार

u
(45) * u३२०९५ uuश्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप)प:प सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीने रु.६४ कोटी देना बँकेच्या वाळकेश्वर शाखेमध्ये फिक्स डिपॉझिट स्वरुपात जमा करुन त्याची पावती न देता शाखा अधिका-याने बोगस कर्जदार हाताशी धरुन ६० कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकरणी सीबीआय चौकशीअंती शाखाधिका-यांस

अटक केली तरीही बोगस कर्जदाराचा शोध अदयापपर्यंत न लागल्याने एपीएमसी गैरव्यवहारात शासनास नुकसान झाल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.` देना बँकेने फिक्स डिपॉझीटच्या पावत्या दिल्या आहेत.त
(2) देना बँकेकडे बाजार समितीने ठेवलेल्या मुदत ठेवीची मुदत पूर्ण झाल्यानंतर सी.बी.आय. तपास सुरु असल्याचे कारण नमूद करुन देना बँकेने मुदतठेवीचे व्याजासह नुतनीकरण केल्याचे कळविले आहे.` याबाबत बाजार समितीने राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण मंच यांचेकडे प्रकरण चालू आहे.` शिवाय, या प्रकरणी तपास पूर्ण झाल्यानंतरच ठेवीची रक्कम मिळणार असल्यामुळे नुकसान झाले किंवा कसे याविषयी आताच निश्चित भाष्य करता येणार नाही.
(3) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथे मार्केट यार्डने आरक्षित केलेल्या जागा शेतकऱ्यांना परत मिळणेबाबत

u

(46) * u२९०६१ uuश्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी)ी:ी
सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मलकापूर (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी शेती उत्पन्न बाजार समिती कोल्हापूर सब मार्केट यार्ड मलकापूर करिता घेतल्या गेलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सब मार्केट यार्ड मलकापूरने आपल्या ऑफिससाठी आरक्षित केलेल्या जागेवर इमारत बांधली असून त्याचा वापर स्वत:साठी न करता । त्यांनी ती इमारत सत्र न्यायालय मलकापूर यांना २५ वर्षे आणि सद्या वारणा बझार यांना भाड्याने दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर इमारतीची जागा बिगर शेती केलेली नाही, हे

खरे आहे काय, तसेच ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी आरक्षित केलेल्या आहेत त्यांना विचारात न घेता तसेच त्यांना कोणताही मोबदला न देता गुंठ्याला ५० पैसे या दराने आरक्षित केल्या असून त्या जमिनीची गुंठ्याला २ ते २.५ लाख या दराने संचालक मंडळाने बेकायदेशीर प्लॉट विक्री चालू केली, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले, व संबंधित संचालक मंडळावर कोणती कारवाईई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्तत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.य खरे आहे.`

(2) माहे` १९९२ ते २००३ या कालावधीत सत्र न्यायालयास भाडयाने दिली होती.ी त्यानंतर बरीच वर्षे इमारत रिकामी होती.ी जुलै २०११ पासून ३/४ जागा वारणा भगिनी मंडळ यांना भाडयाने दिली असून उर्वरित १/४ जागेत बाजार समितीचे कार्यालय सुरु आहे.``

(3), (4) व (५) होय. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन अधिनियम १९६३ चे कलम ४० अन्वये प्लॉट विक्री व इतर मुद्यांची चौकशी होऊन प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने बाजार समितीचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले असून आर्थिक गैरव्यवहारांची जबाबदारी निश्चित करण्यासाठी पणन अधिनियमाच्या कलम ५७(४) अन्वये एक व्यक्ती न्यायाधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे.` न्यायाधिकरणाने चौकशीचे काम पूर्ण केले असून अहवाल तयार करण्याचे काम चालू आहे.` अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

लोहा (जि.नांदेड) येथील आयटीआय बांधकामासाठी उपलब्ध झालेला निधी सार्वजनिक बांधकाम विभागाने परस्पर मुखेड (जि.नांदेड) येथील आयटीआय बांधकामासाठी वापरल्याबाबत

u

(47) * u३६४७९ uuश्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) I: I सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) लोहा (जि.नांदेड) येथील आयटीआय बांधकामासाठी उपलब्ध झालेल्या ६ कोटी ३७ लाख रुपयातील सुमारे ४० लक्ष रुपये सार्वजनिक बांधकाम विभागाने परस्पर मुखेड (जि.नांदेड)ड येथील आयटीआय बांधकामासाठी वापरले असल्याची बाब दिनांक ३ नोव्हेंबर,२०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, लोहाच्या आयटीआय बांधकामाच्या तरतुदीत ४० लाखाची तुट निर्माण झाली, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(4) तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(2) हे खरे नाही.

(3), (4) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

शाखा अभियंता, धुळे यांनी कोणतीही निविदा न मागविता मजूर कामगार सोसायटीच्या नावावर केलेला गैरव्यवहार

u

(48) * u३३५६० uuश्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर)र:र सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) शाखा अभियंता, धुळे यांनी कोणतीही निविदा न मागविता मजूर कामगार सोसायटीच्या नावावर ५० लाख ते १ कोटी रुपयाच्या कामाचे १०-१० लाखाचे भाग करुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गेल्या १७ वर्षांपासून धुळे शहरात ठाण मांडून बसलेले शाखा अभियंता जमुनाप्रसाद गंगवार यांनी केलेल्या कामाच्या दर्जाची तसेच बांधकाम खात्यात ठेकेदाराची कामे करणाऱ्या त्यांच्या बंधूची व

संबंधित संस्थेची सखोल चौकशी करण्याबाबत दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही.
(2), (3) व (४) सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, धुळे यांच्यामार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली असून अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांना प्राथमिक चौकशी अहवालाची छाननी करुन अंतिम अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

u

शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता व ठेकेदार यांनी केलेला गैरव्यवहार

u
(49) * u३०४५५ uuश्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे)`:` सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपअभियंता व ठेकेदार यांच्यातील संगनमत व आर्थिक गैरव्यवहार यामुळे शहापूर तालुक्यातील रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीअंती ठेकेदारांशी संगनमत करुन रस्त्यांच्या कामाचा दर्जा न ठेवता आर्थिक गैरव्यवहार करुन देयके काढणाऱ्या

सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शहापूर येथील उपअभियंता व सर्वसंबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u

श्री. चंद्रकांत पाटील : (१), (2), (3) व (४) या प्रकरणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांचेकडून चौकशी करण्यात येत आहे.

संत ज्ञानेश्वर सहकारी पत पेढी, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई या सहकारी सोसायटीने गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

u
(50) * u२९२५० uu**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**ी:ी सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) संत ज्ञानेश्वर सहकारी पत पेढी, मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई या सहकारी सोसायटीने गुंतवणूकदारांची फसवणूक केली असून अधिकारी व कर्मचा-यांनी २० लाखांचा। गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गुंतवणूकदारांना ठेवीच्या रक्कमा परत देण्यात याव्यात, गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, पोलीस ठाणे, मालवणी, मालाड यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी मोर्चा काढून निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,य
(3) असल्यास, प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,य चौकशीत काय आढळून आले, तदनंतर पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही,
(2) पोलीस विभागाने दिलेल्या माहितीनुसार दि. २५.०८.२०१५ रोजी सदर विषयाच्या अनुषंगाने मोर्चा काढण्यात आलेला नव्हता परंतु श्री

कॅप्टन अभिजित अडसुळ व त्यांच्यासोबतच्या इतर ८-१० तक्रारदारांनी याबाबत पोलीस ठाण्यात पत्र दिलेले आहेत.

(3) सदर संस्थेचे सन २०१२-२०१५ या कालावधीचे लेखापरिक्षण करण्यासाठी अप्पर लेखापरिक्षक वर्ग-२ यांची नियुक्ती करण्यता आली आहे. तसेच दि. २७.११.२०१५ च्या आदेशान्वये विद्यमान व्यवस्थापक समिती सदस्यांना ापदावरुन कमी करुन त्यांच्या जागी सहाय्यक सहकारी अधिकारी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

uuuu संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण पुर्ण झाल्यानंतर याप्रकरणी पुढील कारवाई करता येईल.

uuuu सदर विषयास अनुसरुन दि. १३.१२.२०१४ रोजी मालवणी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीस अनुसरुन कार्यवाही ी चालू असून याबाबत पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

मौजे देवलगाव (जि.गोंदिया) येथील आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थीनीच्या संशयास्पद मृत्यूबाबत

u

(51) * **u३५६०० uuश्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) I: I** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मौजे देवलगाव (जि. गोंदिया) येथील नत्थुजी पुस्तोडे अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यीनी कु.कविता मंगल कुंजाम हिचा दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास संशयास्पद परिस्थितीत दुर्देवी मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या दुर्देवी घटनेची चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१), (2), (3) व (४) चे उत्तर

कु.कविता मंगल कुंजाम या विद्यार्थिनीचा प्राथमिक आरोग्य

केंद्र, नवेगाव येथे उपचार करण्यात आला. ा मात्र प्रकृतीत सुधारणा न झाल्याने` जिल्हा सामान्य रुग्णालय, गोंदिया येथे नेत असतांना रस्त्यातच मृत्यु झाला. शवविच्छेदन अहवाल मध्येचच Respiratory failure due to asphyxia secondary to aspiration नमुद आहे. तथापि viscera त्यांनी पुढील तपासणीसाठी पाठविला आहे. सदर मृत्यु पावलेल्या विद्यार्थीनीच्या पालकास सानुग्रह अनुदान रुपये ७५०००/- अदा करण्यात आले आहे.

---

u

हिंगोली जिल्ह्यातील दलित वस्त्यांची विकास कामे प्रलंबित असल्याबाबत

u

(52) * u३०२९० uu**डॉ.संतोष टारफे (कळमनुरी)**, **श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**, **श्री.नसीम खान (चांदिवली)**, **अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा)**, **श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी)**ी:ी सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) हिंगोली जिल्ह्यातील दलित वस्ती सुधार योजनेसाठी मंजूर करण्यात आलेल्या १५ कोटी निधीपैकी केवळ ५.१८ कोटी निधी प्राप्त झाल्यामुळे २४० दलित वस्त्यांची विकास कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, २४० दलित वस्त्यांच्या विकासासाठी मंजूर करण्यात आलेला संपूर्ण निधी त्यांना मिळण्याबाबत तसेच निधी देण्यास दिरंगाई व टाळाटाळ करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.

(2) हिंगोली जिल्ह्यकरीता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे, या योजनेंतर्गत रक्कम रु. १९.५१ कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत असुन आयुक्तालयाने` दिनांक २३/४/२०१५ च्या आदेशान्वये रक्कम रु.५.१८ कोटी व दिनांक २७/१०/२०१५ च्या आदेशान्वये रक्कम रु. १४,०१,८८,११० अशा एकूण १९,१९,८८,११० अक्षरी रक्कम रुपये

एकोणीस कोटी एकोणीस लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे दहा फक्त इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. उर्वरित निधी रक्कम रु. ३१,११,८७०/- उपलब्ध करुन देण्यात येईल. उपलब्ध निघीमधुन हिंगोली जिल्ह्यातील ३१७ दलित वस्त्यांच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

आंबे (ता.पेठ, जि. नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

(53) * u३११०४ uu**श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंब्रादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)मःम** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) आंबे (ता.पेठ,जि.नाशिक) येथील शासकीय आश्रमशाळेत कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एका विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्याच्या पालकाला आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे आहे.

(2) सदर प्रकरणी मुख्याध्यापक व अधिक्षक हे प्रथम दर्शनी दोषी दिसून आल्याने त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आलेले आहे. तसेच घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प कार्यालय, नाशिक स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आलेली असुन सविस्तर चौकशी सुरु आहे. मृत्यू झालेल्या विद्यार्थ्याच्या पालकास रू. ७५०००/- सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेले आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

आदिवासी विकास विभागाच्या एचडीपीई पाईप खरेदी निविदा प्रक्रीयेमध्ये अनियमितता व गैरप्रकार झाल्याबाबत

(54) * u२८४२८ uu**श्री.छगन भुजबळ (येवला), ॲड.के. सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासी विकास विभागातर्फे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या एचडीपीई पाईप मंजूर होऊनही मागील दोन वर्षांचा कालावधी लोटून गेला तरी लाभार्थ्यांना अद्याप पाईप देण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त निविदा प्रक्रियेची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही, सन २०१३-१४ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय चंद्रपूर अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील एकूण ५५९ लाभार्थ्यांची यादी मंजूर करण्यात आली होती, या सर्व लाभार्थ्यांना दि. ३१/१०/२०१५ पर्यंत एचडीपीई पाईप वाटप करण्यात आलेले आहे, तर सन २०१४-१५ साठी पाईप खरेदीची प्रक्रिया महामंडळाकडून सुरु आहे.

(2), (3) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील कातकरी समाजाच्या वस्तीस्थानांच्या समस्यांबाबत

(55) * u३२२८२ uu**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यातील विशेषत: ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यांमध्ये आदिम जमात म्हणून ओळखल्या जाणा-या कातकरी या आदिवासी समाजाच्या

वस्ती स्थानांना शासनाने गांर्भीयाने घेणेबाबतचे आदेश राज्यपालांनी ी शासनास माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर समाजाच्या वास्तव्याचा अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास समितीने आपल्या अहवालात कातकरी समाजाच्या वास्तव्याबाबत कोणत्या उपाययोजना सूचविल्या आहेत,

(5) तसेच यावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

u

श्री. एकनाथराव खडसे : (१), (2) व (३) कोकणातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील कातकरी जमातीच्या व्यक्तींच्या वस्तीस्थांनांच्या समस्येबाबत मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने कोकणातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील कातकरी समाजातील व्यक्तींच्या घराखालील जागांच्या समस्यांचे सर्वंकष अभ्यासाकरिता विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली शासन परिपत्रक दिनांक १९.१०.२०१५ अनवये समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्तत व्हावयाचा आहे.

(4), (5) व (६) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील उल्हास नदीवर शिरसे ते आवळस येथे पूल उभारण्याबाबत

u

(56) * u३३५३६ uuश्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल)ल:ल सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u
(1) रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील उल्हास नदीवर पुल नसल्याने ग्रामस्थांना शिरसे ते आवळस हा प्रवास करण्यासाठी कित्येक किलोमीटरचा लांबचा प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शिरसे-आवळस हा पुल उभारावा अशी मागणी गेली कित्येक वर्षांपासून तेथील ग्रामस्थ तसेच लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांच्याकडे केली आहे, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, अनेक वर्षे मागणी करुनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हेही खरे आहे काय,
(4) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?
u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.
(2) होय.
(3) व (४) सदर पुलाचे बांधकामासाठी रुपये ३.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर पुलाचे बांधकाम निधी, निकष व मंजूरीच्या अधीन करण्याचे नियोजन आहे.

ऊस उत्पादक शेतक-यांना ऊसाला रास्त व किफायतशीर किंमत (एफआरपी) ३ टप्प्यात देण्याबाबत

(57) * u३४४५३ uuश्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) I: I सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) ऊस उत्पादक शेतक-यांना ऊसाला प्रति टन २५०० रु. रास्त व किफायतशीर किंमत (एफआरपी) ३ टप्प्यात देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, यावर निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय,
(3) त्यानुसार शेतक-यांना एक रकमी पुर्ण हंगामाची एफआरपी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१), (2) व (३) केंद्र शासनाने दि. २/२/२०१५

च्या अधिसूचनेन्वये हंगाम २०१५-१६ करिता ९.५०% साखर उताऱ्याकरिता प्रति टन रु. २३००/- व त्यापुढील १% उताऱ्याकरीता रु. २४२/- या प्रमाणे FRP दर जाहीर केला आहे.

शुगरकेन कंट्रोल ऑर्डर १९६६ मधील तरतुदीनुसार गाळपास आलेल्या ऊसाला किमान FRP नुसार विहीत मुदतीत देयके अदा करणे कारखान्यांना बंधनकारक आहे. तसेच महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊसाचे दराचे विनियम अधिनियम, २०१३ मधील कलम ५ (1) नुसार ऊस पुरवठादार शेतकऱ्यांस पहिला हप्ता FRP प्रमाणे ऊस पुरवठा केलेनंतर १४ दिवसात देणेची तरतूद आहे.

FRP तीन टप्प्यात देण्याचा प्रस्ताव सध्या शासनाच्या विचाराधीन नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही

राज्यातील वस्त्रोद्योग संकटात असल्याबाबत

(58) * u२८३९९ uuश्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी)ी:ी सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील वस्त्रोद्योग हा वीजदरातील वाढ, नवे वस्त्रोद्योग धोरण आणि कापूस खरेदीवर कंपनीच्या साठेबाजीमुळे संकटात आला आहे त्यामुळे १६० सूतगिरण्या बंद ठेवाव्या लागणार असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या सूतगिरण्यांना उत्पादक खर्च व बाजारातील दराचे गणित जमू शकेल त्यासाठी सहकार्य योजना देण्याबाबत तसेच वस्त्रोद्योगाला चालना देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

uuuu राज्यात एकूण ६६ सहकारी सूतगिरण्या उत्पादनाखाली आहेत.

पैकी ११ सहकारी सूतगिरण्या आर्थिक अडचणीमुळे बंद असलेल्या ११ सहकारी सूतगिरण्यापैकी ८ सहकारी सूतगिरण्यांनी मंजूर प्रकल्प अहवालाप्रमाणे स्व-भागभांडवल व वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारणी केली नसल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने उत्पादनाखाली न आणल्याने वर्धनक्षमता कमी होऊन बंद झाल्या आहेत. तसेच ३ सहकारी सूतगिरण्या यंत्रसामुग्री जुनी असल्याने उत्पादन क्षमता कमी होऊन बंद झाल्या आहेत.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

जात पडताळणी विभाग, कोल्हापूर यांनी गैरमार्गाने बी.सी., ओबीसी (कुणबी) दाखले दिल्याबाबत

(59) * u३४४२७ uuश्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी)ी:ी सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) जात पडताळणी विभाग, कोल्हापूर यांनी गैरमार्गाने बी.सी., ओबीसी(कुणबी) दाखले दिल्याचे`माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मूळ बी.सी., ओबीसी(कुणबी) लाभ धारकांवर अन्याय झाल्याने जातपडताळणी विभागाकडे तक्रार करून देखील जातपडताळणी अधिकारी यांनी चुकीच्या पद्धतीने दाखले वितरीत केले हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच दोषी जातपडताळणी अधिकारी व गैरमार्गाने दाखले मिळवणारे नागरिक यांचेवर फौजदारी गुन्हे दाखल करून दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) व (२) हे खरे नाही.

(3) सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ अंतर्गत महाराष्ट्र

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २०१२ विहित करण्यात आले आहेत. सदर नियमानुसार जातपडताळणीचे कामकाज करण्यात येते.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

देवहंडी (ता.अकोले,जि.नगर) येथील मुलींना शाळेकरिता पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याबाबत

(60) * u३३३९० uu**श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)**ी:ी सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) देवहंडी (ता.अकोले,जि.नगर) धरणाच्या पलीकडील वस्तीत राहणाऱ्या मुली तराफयावर बसून जलप्रवास करत शाळेत जात असल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ५० मीटर पेक्षा जास्त खोली असलेल्या पाण्यात तराफ्यावरुन बालकांचा प्रवास करणे धोक्याचे आहे, हेही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने या ठिकाणी पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) व (२) हे खरे आहे.

(3) विषयाधीन वस्तीवरील लोकसंख्या २५ एवढी असल्याने पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देणे शक्य नाही. मात्र भोजदरावाडी येथे जाण्यासाठी सध्या पर्यायी रस्त्याचा मार्ग उपलब्ध आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

राज्यातील विशेषत: मुंबई उपनगरातील आदिवासी समाजाकडे जातीचे दाखले नसल्याबाबत

u

(61) * u३१६९९ uu**श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पास्कल धनारे (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम)म:म** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यातील विशेषत: मुंबई उपनगरातील आदिवासी समाजातील ७० टक्के आदिवासींकडे जातीचे दाखले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, परिणामी अशा आदिवासींना शासनाच्या योजनांपासून वंचित रहावे लागत असल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, आदिवासींच्या घरोघरी जाऊन त्यांना जातीचे दाखले देण्याबाबतच्या सूचना शासनामार्फत देऊनही बहुतांश आदिवासी हे जातीच्या दाखल्यांपासून वंचित राहिल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासींना जातीचे दाखले तात्काळ मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१), (2), (३) हे खरे नाही.

uuuuu शासनाने uमहाराष्ट्र अनसूचित जाती ी अनुसूचितत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्याअंतर्गत महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ तयार केलेले आहेत. त्यामधील तरतुदीनुसार कागदपत्राची पूर्तता करणाऱ्या अर्जदारास सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात येते.

(4), (5) व (६) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

यवतमाळ जिल्ह्यातील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहात विद्यार्थीनींना निष्कृष्ट सुविधा दिल्या जात असलेबाबत

u

(62) * u२९९२७ uu**श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मदन येरावार (यवतमाळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), प्रा.अशोक उईके (राळेगाव)व:व** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड, कळंब व घाटंजी तसेच नाशिक जिल्ह्यातील नवाशी येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयातंर्गत चालविण्यात येत असलेल्या आदिवासी वस्तीगृह व आश्रमशाळांमध्ये निकृष्ट जेवण, पाण्याचा अभाव, न होणारी आरोग्य तपासणी इत्यादी असुविधा असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच उपरोक्त जिल्ह्यातील वसतीगृहांच्या व आश्रमशाळांच्या इमारती जीर्ण झाल्या असून या इमारतीत वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन पौष्टीक जेवण व इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) यवतमाळ जिल्ह्यात घांटजी तालुक्यातील जांब या ठिकाणी आदिवासी विभागांतर्गत कार्यान्वीत असलेली शासकीय माध्यमिक कन्या शाळेत भोजनाबाबत काही अंशी असुविधा असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र यवतमाळ व नाशिक जिल्ह्यात अन्य ठिकाणाचे आश्रमशाळा व वसतीगृह प्रस्तुत असुविधा विषयीच्या बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

(2) हे खरे नाही.

(3) व (४) शासकीय आश्रमशाळा, जांब ता.घाटंजी जि.यवतमाळ या

शाळेतील भोजनासंबंधी बातमी दि. २७/८/२०१५ रोजी दैनिक लोकमत या वृत्तपत्रात प्रसारीत झाली होती. त्याअनुषंगाने चौकशी केली असता सदर आश्रमशाळेचे अधिक्षक व स्वयंपाकी हे कर्मचारी त्यांचे कर्तव्य व जबाबदारीत दुर्लक्ष करीत असल्यामुळे या दोषी कर्मचाऱ्यांना अप्पर आयुक्त, अमरावती व प्रकल्प अधिकारी, पांढरवाडा जि.यवतमाळ यांनी निलंबित केले असून त्यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई सुरु आहे. तसेच सर्व वसतीगृहे व आश्रमशाळांमध्ये इतर सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

---

u

मुरुड-केळघर-रोहा (जि.रायगड) राज्य मार्गावरील कवळठे येथे दरड खाली आल्याने रस्ता धोकादायक व अरुंद बनल्याबाबत

u

(63) * **u३०३७८ uuश्री.भरतशेठ गोगावले (महाड)ड:ड** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) रायगड जिल्हयातील मुरुड-केळघर-रोहा येथील राज्य मार्गावरील कवळठे या आदिवासी वाडी जवळ दरड खाली आल्याने रस्ता धोकादायक व अरुंद बनल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे,`हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त रस्ता अरुंद असल्यामुळे वाहनांची कोंडी होत असून मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही, सदर भाग डोंगराच्या कडेला असल्याने पावसाळ्यामध्ये डोंगरावरची माती रस्त्यावर येते. सदर माती वेळोवेळी त्वरीत हटविण्यात येते.

(2) नाही.

(3), (4) व (५) प्रश्न उद्भ्वत नाही.

---

u

वाळूज (जि.औरंगाबाद) येथील बजाजनगरातील खदानीसाठी दिलेल्या एमआयडीसीच्या जागेत झालेले अतिक्रमण

u

(64) * u३३१६२ uu**श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) वाळूज (जि.औरंगाबाद) येथील बजाजनगरातील खदानीसाठी दिलेल्या एमआयडीसीच्या जागेत केरकचरा व मुरुम माती टाकून खदानीचे सपाटीकरण करुन त्यावर अतिक्रमण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरील अतिक्रमणाकडे एमआयडीसी प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. सुभाष देसाई : (१)१ हे खरे आहे.

(2)2 व (३) हे खरे नाही.

वाळूज औद्योगिक क्षेत्रातील महामंडळाच्या मोकळ्या जागेवरील रस्त्याच्या जागेवर झालेले अतिक्रमण सन २०१०, सन २०१३ तसेच सप्टेंबर २०१५ मध्ये पोलीस बंदोबस्त घेऊन काढून टाकण्यात आलेले आहे.` तसेच ऑक्टोबर २०१५ मध्येही ५ अनधिकृत धार्मिक स्थळे पोलीस बंदोबस्त घेऊन निष्कासीत करण्यात आलेली आहेत. उर्वरीत अतिक्रमणासंदर्भात महामंडळातर्फे औरंगाबाद महानगरपालिका यांच्याकडे अतिक्रमण निष्कसीत करण्यासाठी पोलीस बंदोबस्ताची मागणी ०८/१०/२०१५ च्या पत्रान्वये करण्यात आलेली आहे. निष्कासन पथक उपलब्ध होताच कायदेशीर बाबी तपासून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

शासनाने जाहीर केलेल्या व्यापारी धोरणाबाबत

(65) * u२८३४४ uuश्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल)ल:ल सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यात शासनाने जाहीर केलेले व्यापारी धोरण मोठ्या कंपन्या, मॉलच्या फायद्याचे आहे असे मत मांडून राज्यातील काही व्यापारी संघटनांनी माहे सप्टेंबर २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात विरोध दर्शवला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सर्वच व्यापाऱ्यांसाठी धोरण असावे म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. सुभाष देसाई : (१) प्रस्तावित uमहाराष्ट्र किरकोळ व्यापार धोरण u2015 चा मसुदा संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यावर रिटेल असोशिएशनच्या संघटनांनी हे धोरण मोठया कंपन्या/मॉलच्या फायदयाचे आहे असे मत मांडले आहे.

(2) व (३) प्रस्तावित uमहाराष्ट्र किरकोळ व्यापार धोरण u २०१५ चा मसुदा शासनाच्या नवीन संदेश (whats new) या संकेतस्थळावर जनतेच्या हरकती/सूचना देण्यासाठी दिनांक २७/०७/२०१५ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता. जनतेकडून तसेच विविध किरकोळ व्रिक्रेता संघटना/असोशिएशन यांचेकडून प्राप्त झालेल्या हरकती/सूचना विचारात घेऊन, विकास आयुक्त (उद्योग) यांचे स्तरावर रिटेल असोसिएशन यांचे सोबत दिनांक ०४/०९/२०१५ रोजी बैठक घेऊन व रिटेल संघटनाशी दिनांक १९/०९/२०१५ रोजी समन्वय साधून प्रथमच uमहाराष्ट्र किरकोळ व्यापार धोरणण २०१५ तयार करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही. ीीीी u uu uuuuu

---

u

अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील निधीच्या गैरव्यवहाराबाबत

u

(66) * u३४५४३ uuश्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक)क:क सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळातून औरंगाबादच्या मे. मंत्री शुगर ॲन्ड ट्रेडिंग कंपनीला २५ कोटी रुपये दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त रक्कम साखर कारखान्याच्या खात्यावर न जाता कोमराल कंपनीकडे वळविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?u

श्री. राजकुमार बडोले : (१) हे खरे आहे.

(2) हे खरे आहे.

(3) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळातील निधीचा गैरव्यवहार व गैरवापर प्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून दहिसर पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल केला असून राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत महामंडळाच्या वित्तीय वर्ष २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीतील सर्व व्यवहाराचा सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास चालू आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

राज्यात १ लाख १५ हजार शेतकऱ्यांचे कर्जमाफीचे प्रस्ताव सादर न झाल्याबाबत

u

(67) * u३३८९६ uuश्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर)र:र सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1)1 शासनाने ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात औरंगाबाद

जिल्ह्यातील १० सावकांराची १ कोटी ३२ लाख रुपयांची कर्ज फेड करीत ७१६ शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करुन घेतला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, विदर्भ मराठवड्यातील आणखी ६३७६ शेतक-यांना कर्जमुक्ती मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाच्या किचकट नियमामुळे अद्यापही १ लाख १५ हजार शेतकऱ्यांचे कर्जमाफीचे प्रस्तावच सादर झालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सावकारांच्या कार्यक्षेत्राचा प्रश्न सोडवून कार्यक्षेत्राबाहेरील सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय,

(2) पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. इतर कर्जदारांची प्रकरणे तपासण्याचे कामकाज चालु आहे. तालुका व जिल्हास्तरीय समितीच्या स्तरावर कर्जमाफीस पात्र ठरलेल्या उर्वरित कर्जदार शेतकऱ्यांना कर्जमाफी योजनेचा लाभ देण्यात येईल.

(3) नाही.

(4) कार्यवाही चालु आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

सोलापूर जिल्ह्यातील संत एकनाथ महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील समस्या दूर करण्याबाबत

u

(68) * u३५३३१ uuश्री.बबनराव शिंदे (माढा) I: I सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) सोलापूर जिल्ह्यातील संत एकनाथ महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गांवरील समस्या निवारण्याची मागणी करून शासनाने सदर रस्त्यांच्या दूरूस्ती व समस्यांबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने वारक-यांनी दिनांक २५ जुलै, २०१५ रोजी वा त्या ा सुमारास भिमा नदी पात्रात आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(2) उपरोक्त मागणी संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे निवेदन सादर केले, हेही खरे आहे काय,
(3) असल्यास, आंदोलनकर्त्या वारक-यांच्या व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागण्या कोणकोणत्या कामाबाबत आहेत,
(4) तसेच वारक-यांनी केलेल्या मागण्यांनुसार शासनाने आत्तापर्यंत कोणकोणती कामे केली आहेत, तसेच उर्वरीत कामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतत आहे,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे आहे.
(2) हे खरे आहे.
(3) श्री. संत एकनाथ महाराज पालखी मार्गावरील मुंगशी ते पंढरपूर या मार्गावरील संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण करणे , कौठाळी ी गावाजवळ भीमा नदीवरर व सदर मार्गावर इतर आवश्यक ठिकाणी पुल बांधणे, व संत तुकाराम महाराज पालखीमार्गाचे चौपदरीकरण करणे याबाबत मागण्या केलेल्या आहेत.
(4) श्री.संत एकनाथ महाराज पालखी मार्गापैकी ५.५ कि.मी. लांबीस रस्ते विकास योजना २००१-२१ अनूसार कोणताही दर्जा नसल्यामुळे त्यावर कोणतेही काम प्रस्तावित नाही. तथापि या मार्गावर ५.३ कि.मी. लांबीमध्ये डांबरीकरण पुर्ण झाले असून ८ कि.मी.लांबीमध्ये प्रगतीत आहे. उर्वरीत मार्गावरील डांबरीकरण व मजबुतीकरण व आवश्यक ठिकाणी पुल बांधण्याची कामे विविध योजनांमधून टप्याटप्याने निधी उपलब्धतेनूसार करण्याचे नियोजन असून सदर मार्गावर कौठाळी येथे भीमा नदीवर मोठा पुल बांधण्याचे काम सद्यस्थितीत निविदास्तरावर आहे .तसेच संत तुकाराम महाराज पालखी मार्गापैकी ४.९ कि.मी लांबी चौपदरी असून चौपदरीकरण न झालेल्या लांबीत चौपदरीकरणण करण्यापुर्वी मार्गालगतच वारकऱ्यांसाठी स्वतंत्र मार्गिका बांधण्यासाठी भूसंपादन करण्याचे प्रस्तावाधिन आहे.`
(5) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

मुंबईतील अंधेरी येथिल कार्यकारी अभियंता यांनी अधिकारी निवासस्थानाच्या दुरूस्ती देखभालीच्या कामात केलेला गैरव्यवहार

u

(69) * u३४३३५ uuश्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व)व:व सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मुंबईतील अंधेरी येथिल उत्तर विभागाअंतर्गत येणाऱ्या अंधेरी उपविभागाचे अभियंता यांनी संगनमताने कृतिका बंगलो या अधिकारी निवासस्थानाच्या दुरूस्ती देखभालीच्या नावाने कोटयवधीचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या एकाच शासकीय अधिकारी निवासस्थानाच्या देखभाल दुरूस्ती करीता अनेक वेगवेगळे दुरूस्तीचे कामे दाखवून निविदा काढून कोणते ही काम न करताच खोटी बिले पारित करून घेतले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर शासनाने कोणती कारवाईई केली वा करण्यात येत आहे

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही. तथापि, दैनिक कोकण चौफेर चे संपादक सर्वश्री किशोर कांबळे व निसार जे.शेख यांची दि.२३/१०/२०१५ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळाकडून चौकशी आदेशित केली आहे.

uuuuu अहवाल प्राप्त झालेनंतर अंतिम कार्यवाही करण्यात येईल.

(2), (3) व (४) चौकशी अहवाल प्राप्त झालेवर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

शासकीय कामांचे खोटे चाचणी अहवाल सादर केल्या प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २२ अभियंत्यांना निलंबित करण्यात आल्याबाबत

u

(70) * u२८५६९ uuश्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल),

श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर)र:र सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) शासकीय कामांचे खोटे चाचणी अहवाल सादर करून कोट्यवधींची बनावट कामे दाखवल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २२ अभियंत्यांना दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निलंबित करण्यात आले व १९ कंत्राटदार यांचा काळ्या यादीत समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू गैरव्यवहार किती रक्कमेचा झालेला आहे तसेच कोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे व कोणत्या कंत्राटदारांचा काळ्या यादीत समावेश करण्यात आला आहे,

(3) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व तद्नंतर काय कायदेशीर कारवाई करण्यात आली वा येत आहे तसेच शासकीय कामांची प्रत्यक्ष पाहणी न करता तसेच सत्यता न तपासता राज्यातील विविध दक्षता व गुणनियंत्रण कार्यालयातून दिल्या जाणाऱ्या चाचणी अहवाल अथवा प्रमाणपत्रावर अंकुश ठेवण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) व (२) अंशत: खरे आहे.

uuuu महालेखापाल यांनी निदर्शनास आणून दिलेल्या ।२५ कामांच्या यादीनुसार शासनाचे चाचणी शुल्काचे रु.१,१४,२५०/- इतक्या रक्कमेची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

uuuu याअनुषंगाने दि.०१.०९.२०१५ च्या शासन आदेशान्वये खालील १९ अभियंत्यांना निलंबित करण्यात आले.

uuuu (1) श्री.के.पी.पाटील, कार्यकारी अभियंता,
uuuu (2) श्री.सी.बी.पाटील, कार्यकारी अभियंता,
uuuu (3) श्री.ए.एस.पोळ, उप कार्यकारी अभियंता,
uuuu (4) श्री.एस.जी.पवार, शाखा अभियंता,
uuuu (5) श्री.एस.एम.शेट्ये, शाखा अभियंता,
uuuu (6) श्री.व्ही.पी.जोशी, शाखा अभियंता,

uuuu (7) श्री. आर.पी.मेळेकर, शाखा अभियंता,
uuuu (8) श्रीमती एन.एन.जाधव, शाखा अभियंता,
uuuu (9) श्री.पी.जी.मोरे, शाखा अभियंता,
uuuu (10) श्री.एच.के.पाटील, शाखा अभियंता,
uuuu (11) श्री.एस.डी.केदार, शाखा अभियंता,
uuuu (12) श्री.एस.बी.भागवत, शाखा अभियंता,
uuuu (13) श्री.ए.व्ही.थोरात, शाखा अभियंता,
uuuu (14) श्री.एस.एस.जाधव, शाखा अभियंता,
uuuu (15) श्री.एम.डी.देशपांडे, शाखा अभियंता,
uuuu (16) श्री.एम.व्ही.मांजरेकर, शाखा अभियंता
uuuu (17) श्री.एस.जी.जाधव, शाखा अभियंता,
uuuu (18) श्री.ए.आर.घडले, शाखा अभियंता,
uuuu (19) श्री.एम.वाय.कुरेशी, शाखा अभियंता,
uuuu तसेच खालील १८ कंत्राटदारांचा काळ्या यादीत समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
uuuu (1) सय्यद सिध्दीकी अली नासिर अली, सुशिक्षित बेरोजगार अभियंता.
uuuu (2) किरण चंद्रकांत हाडवळे, सुशिक्षित बेरोजगार अभियंता
uuuu (3) काझी मोहमद रेहाना, सुशिक्षित बेरोजगार अभियंता
uuuu (4)4 गितांजली मजूर सहकारी संस्था मर्यादित (म.स.स.म.)
uuuu (5) प्रभाग म.स.स.म.
uuuu (6) अभिनव म.स.स.म.
uuuu (7) गिरनार म.स.स.म.
uuuu (8) माता रमाई म.स.स.म.
uuuu (9) श्री.तिरुपती म.स.स.म.
uuuu (10) श्री.स्वामी विवेकानंद म.स.स.म.
uuuu (11) दर्शना म.स.स.म.
uuuu (12) शिवसाई म.स.स.म.
uuuu (13) नवोदय म.स.स.म
uuuu (14) मिलिंद म.स.स.म.
uuuu (15) समिर म.स.स.म.
uuuu (16) श्री.गणेश कामगार म.स.स.म.
uuuu (17) चारकोप गावकर म.स.स.म.
uuuu (18) चंद्रमणी म.स.स.म.

(3) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त तपासणी अहवालामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या तसेच संबंधित कंत्राटदार व दोन सेवानिवृत्त उप अभियंते यांचेविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रा.विभाग, मुंबई यांना देण्यात आल्या आहेत.

uuuu दक्षता व गुणनियंत्रण कार्यालयातून दिल्या जाणाऱ्या चाचणी अहवाल अथवा प्रमाणपत्राबाबत बांधकाम साहित्याच्या सुधारीत प्रणालीचा वापर करुन आढळलेल्या त्रुटीची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच चाचणी अहवाल दक्षता व गुणनियंत्रण प्रयोशाळेतून ई-पेमेंट गेटवेद्वारे करण्यात येत आहेत.

(4) प्रश्न उद्भ्वत नाही.

ठाणे येथील कोपरी कॉलनी भागात असलेल्या आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहातील छताचा एक भाग कोसळल्याबाबत

(71) * u३७०३१ uuश्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व)व:व सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) ठाणे पूर्व येथील कोपरी कॉलनी भागात असलेल्या साईनाथ कृपा हौसिंग सोसायटी या इमारतीच्या सातव्या मजल्यावरील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतीगृहातील छताचा एक भाग दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळल्याने भावना भुसारा ही विद्यार्थींनी जखमी झाली, हे खरे आहे काय,

(2) सदर वसतिगृहातील छत गळके असून, भिंतींच्या खांबांना तडे गेले असून, वसतिगृहातील लिफ्टही गेल्या चार वर्षापासून बंद असल्याने वसतिगृहातील विद्यार्थीनींना सात मजले पायी चढून जावे लागत असून या वसतिगृहाच्या इमारतीला धोकादायक इमारत अशी नोटीसही ठाणे महापालिकेने बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर वसतिगृह सुरक्षित जागेत स्थलांतरित करण्याचे आदेश मा.आदिवासी विकास मंत्री यांनी देऊनही तसेच याबाबत वसतिगृहातील वॉर्डन यांनी शासनाकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(4) तसेच एका राजकीय पक्षाचे ठाणे जिल्हा समन्वयक यांनी राज्य मानवी हक्क आयोगाकडे तक्रार केली असून आयोगाचे अध्यक्ष यांनी

आदिवासी विकास आयुक्तांकडे स्पष्टीकरण मागितले आहे, हे ही खरे आहे काय,
(5) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) व (२) हे खरे आहे.
(3) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, कोपरी, ठाणे करिता भाडयाने इमारत मिळण्यासाठी प्रकल्प कार्यालयामार्फत स्थानिक वृत्तपत्रांमध्ये वारंवार जाहिरात देण्यात आली होती. तसेच प्रकल्प अधिकारी, मुंबई यांच्यामार्फत वसतीगृहाकरिता जागा इमारत मिळण्याबाबत विविध प्रशासकीय कार्यालयांकडे मागील दोन वर्षापासून पाठपुरावा सुरु आहे. तथापि, त्यास प्रतिसाद मिळाला नाही.
uuuu उन्नती वुड फेज या निवासी प्रकल्पात उपलब्ध असलेल्या सदनिका वसतीगृहाकरिता भाडे, खरेदी तत्वावर मिळण्यासाठीचा प्रस्ताव माहे जून २०१५ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव सदर विकास विभागास मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून त्याबाबत पाठपुरावा सुरु आहे.
(4) हे खरे आहे.
(5) व (६) वसतीगृहाकरीता नवीन इमारत भाडयाने घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

---

u

मुंबई-पुणे एक्सप्रेस रस्त्यावर छोट्या वाहनांना आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमाफी देण्याबाबत

u

(72) * u३०८२८ uu**श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.योगेश सागर (चारकोप)प:प** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्य रस्ते विकासस महामंडळाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार मुंबई-पुणे एक्सप्रेस रस्त्यावर सन २०१८ पर्यंत टोलव्दारे २८६९ कोटी रुपये जमा होणे अपेक्षित असून त्यापैकी तब्बल २३०६ कोटी रुपये ऑगस्ट २०१५ पर्यंत जमा झाले असून केवळ ५६३ कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रस्त्यावरील टोलच्या करारानुसार अपेक्षित रक्कम मार्च २०१७ पर्यंत वसूल होण्याची शक्यता आहे, हेही खरे आहे काय,

(3) तसेच,दि. २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरुन जाणाऱ्या एस.टी.महामंडळाच्या बसेसना टे ालच्या दरात सवलत देण्याबाबत आयआरबी कंपनीशी झालेल्या करारनाम्यात नमूद करण्यात येऊनही आत्तापर्यंत एस.टी.महामंडळाच्या बसेसला करारनाम्यातील अटीनुसार टोलमध्ये सवलत देण्यात आली नसल्याची बाब श्री.विवेक वेलणकर यांना मिळालेल्या माहिती अधिकाराच्या माहितीतून उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, तदनुषंगाने सदर रस्त्यावर छोट्या वाहनांना आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसना टोलमाफी देण्याबाबत शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. एकनाथ शिंदे : (१) व (२) नाही. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गासाठी निविदा अटीनुसार मंजूर रोकड प्रवाहानुसार रु. २८६९ कोटी वर्ष २०१८-१९ पर्यंत वसूल होणे अपेक्षित आहे. तथापि, देखभाल दुरुस्ती व पथकर गोळा करण्यासाठी इतर आवश्यक खर्च गृहीत धरल्यासस निव्वळ जमा रु.२३१४.६७ कोटी रक्कम अपेक्षित आहे.

(3) अशा आशयाची तरतुद करारनाम्यात नाही.

(4) शासनाचे पथकर धोरण व प्रकलपाचा अभ्यास करुन अहवाल सादर करणेकरीता शासनाने अतिरिक्त मुख्य सचिव (सा.बां.विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून समितीच्या अहवालातील शिफारशीस अनुसरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(5) प्रश्न उद्‌भ ावत नाही.

---

u

दापोली (जिल्हा रत्नागिरी) येथील आडे फाटा ते कादिवली रस्त्याच्या दुरुस्तीबाबत

(73) * u३५१९४ uu**श्री.संजय कदम (दापोली)**ी:ी **तारांकित प्रश्न क्रमांक २७६९४ ला दिनांक ३० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात**: u सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील आडेफाटा ते कादिवली हा सुमारे २९ कि.मी.चा रस्ता २० वर्षापासूननन पुर्णत: नादुरुस्त व वाहतूकीस अयोग्य असून देखील गेल्या १० वर्षात सदर रस्त्याच्या दुरुस्तीवर केवळ रुपये एक कोटी इतकी अत्यल्प तरतूद खर्च करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तरतदू ीतून सुधारणा करण्यात आलेल्या सुमारे ८ कि.मी. रस्त्याचे काम देखील आत्यंतिक निकृष्ट दर्जाचे करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

३) सदरहू रस्ता हा मुंबई-पुणे यासारख्या मोठ्या शहरातून येणाऱ्या पर्यटकांकरीता आंजर्ले-केळशी-आडे या निसर्गरम्य स्थळांना जोडणारा एकमेव रस्ता असल्याने, पर्यटनाला चालना देण्यासाठी उक्तत रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम तातडीने हाती घेऊन त्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) उक्त रस्त्याच्या संपूर्ण दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम तातडीने व निश्चित कालावधीत पुर्ण करण्याबाबत शासन स्तरावरील नियोजनाचे स्वरुप काय आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) सद्स्थितीत विषयांकित २९.०० किमी पैकी ११.५० किमी लांबी सुस्थितीत असून उर्वरित १७.५० किमी लांबी क्षतीग्रस्त आहे. गेल्या १० वर्षात सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु. १२३.६२ लक्ष खर्च झाला आहे.

(2) नाही.

(3) सद्यस्थितीत या रस्त्यावर पूरहानी योजनेअंतर्गत १.३० किमी लांबीचे रु. ३०.०० लक्षाचे काम प्रगतीपथावर आहे.

(4) सदरहू रस्त्यावरील खड्डे डांबरीमिश्रीत खडीने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदरहू रस्त्याच्या क्षतिग्रस्त डांबरी पृष्ठभागाच्या नुतनीकरणाची कामे हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.

आदिवासी विकास विभागाने खाजगी वकिलांच्यां केलेल्या नेमणूका ।

(74) * u३०५११ uuश्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) ।: । सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) अनुसूचित जमातीच्या अनेक प्रकरणामध्ये शासनाने सरकारी वकिलांची नियुक्ती केलेली असतानाही आदिवासी विकास विभागाकडून काही प्रकरणांमध्ये खाजगी वकिलांची नेमणूक करुन एका वकिलांवर लाखो रुपयांची फी दिली जाते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अनेक प्रकरणांमध्ये हे खाजगी वकिल न्यायालयात वेळेवर उपस्थित राहत नाहीत त्यामुळे मा.उच्च न्यायालयाच्या न्याय प्रक्रियेमध्ये वेळ वाया जातो ही बाब शासनाच्या निदर्शनास मा.उच्च न्यायालयाने आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, त्यामुळे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी प्रमाणपत्र समितीच्या पॅनलवर नेमणूका केलेल्या सर्व खाजगी वकिलांच्या नेमणूका तात्काळ रद्द करण्याचे निर्देश देऊन त्यानुसार त्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करण्याबाबत प्रधान सचिव, विधी व न्याय, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांना दिनांक १९ जुलै, २०१५ रोजीच्या सुमारास आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, आतापर्यंत किती खाजगी वकिलांना जातपडताळणी समितीवरुन काढून टाकण्यात आले,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) विधी व न्याय विभागाच्या दि. ०९.०२.२०१४ व दि. ३०.०८.२०१४ च्या अधिसूचनेअन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र

तपासणी समितीची मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच खंडपीठ नागपूर व औरंगाबाद येथे व मा. सर्वोच्च न्यायलय नवी दिल्ली येथील रिट याचिका व विशेष अनुज्ञा याचिका व विशेष अनुज्ञा याचिका हाताळयाकरिता दोन वर्षाच्या कालावधीसाठी विधी तज्ञांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती. या विधी तज्ञांची काही महत्वाच्या प्रकरणांमध्ये आदिवासींचे हित, संरक्षण विचारात घेऊन नियुक्ती करण्यात आलेली होती.

(2) होय, हे खरे आहे.

(3) व (४) मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांना रिट याचिका क्र. २५०८/२०१५ याप्रकरणी दिनांक १५ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द विधी विभागाच्या मान्यतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात आदिवासी विकास विभागामार्फत विशेष अनुज्ञा याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे.

uuuuu सद्यस्थितीत सदर पॅनलवरील वकील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या सर्व न्यायालयीन प्रकरणांसंदर्भात संबंधीतत उच्च न्यायालय काम पाहू शकणार नाही असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले असून त्यानुसार दि. ३०.११.२०१५ च्या ा शासन पत्रान्वये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सर्व संबंधिताना सूचना देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(5) प्रश्न उद्भ ावत नाही.

राज्यातील सुमारे १९०० आश्रमशाळांना अनुदान मिळण्याबाबत

u

(75) * u३०००२ uu**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील मागास, दुर्लक्षित समाजामधील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेल्या सुमारे १९०० आश्रम शाळांना अद्याप अनुदान प्राप्त झाले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अनुदानाअभावी गरीब विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ

आली आहे, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) नाही, हे खरे नाही.
uuuu राज्यात विजाभज प्रवर्गाच्या स्वंयसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या ९७५ शासनमान्य आश्रमशाळा आहेत.त सदर आश्रमशाळांना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता उच्च माध्यमिक आश्रमशाळा वगळून रु. ५५२.७९ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.
(2) राज्यातील सर्व ९७५ शासनमान्य आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना परिपोषण अनुदान देण्यात येते.` त्यामुळे अनुदानाअभावी विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची उपासमार होण्याचा प्रश्न उद्भ्वत नाही.
(3) प्रश्न उद्भ्वत नाही.
(4) प्रश्न उद्भ्वत नाही.

औरंगाबाद शहरातील आदिवासी मुलींच्या वसतिगृहामध्ये मुलींना अन्नातून विषबाधा झाल्याबाबत

u
(76) * u२९००० uuश्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व)व:व सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) औरंगाबाद शहरातील ज्युबिली पार्क येथील आदिवासी मुलींच्या वस्तीगृहामध्ये मुलीना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, विषबाधा झालेल्या मुलींना अन्नातून विषबाधा झाल्यामुळे त्यांना देण्यात आलेल्या आहाराची चौकशी वसतीगृहाच्या अधीक्षकांनी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व निकृष्ट दर्जाचे विषबाधित अन्न देणा-यांविरुध्द आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, ज्युबिली पार्क, औरंगाबाद येथे दि. १०.०८.२०१५ रोजी उपस्थित ११२ विद्यार्थ्यीनींपैकी ७ विद्यार्थीनीना पोटदुखी व मळमळीचा त्रास होत असल्यामुळे त्यांना शासकीय रुग्णालय, औरंगाबाद येथे औषधोपचारासाठी ी दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे.

(2) औषध वैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या अहवालानुसार सदर प्रकरणी अन्नविषबाधेची शक्यता कमी असून दुषित पाण्यामुळे आजाराची शक्यता नमूद केली आहे. प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद यांच्याकडे पाण्याचे नमुने तपासण्याकरीता पाठविण्यात आले आहेत.तसदर तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त असून प्रादेशिक आरोग्य प्रयोगशाळा, औरंगाबाद यांच्याकडे त्याकरीता पाठपुरावा सुरु आहे.

(3) व (४) प्रश्न उद्भ ावत नाही.

जांभुळ, (ता. कल्याण, जिल्हा. ठाणे) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर साकार टेक्निकल प्रशिक्षण केंद्र बंद असल्याबाबत

u

(77) * u३२२११ uuश्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व)व:व सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील सफाई कामगारांच्या पाल्यांकरिता शासनाने सन १९९२ पासून जांभुळ (ता. कल्याण, जि. ठाणे) येथे बांधलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर साकार टेक्निकल प्रशिक्षण केंद्र बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर केंद्र बंद असण्याचे काय कारण आहे तसेचच प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व प्रशिक्षण केंद्र कधीपर्यंत सुरु होणार आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील सफाई कामगारांच्या पाल्यांकरिता जांभूळ (ता.कल्याण, जि. ठाणे) येथे बांधलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर साकार टेक्निकल प्रशिक्षण केंद्र सन १९९७-९८ पासून बंद आहे.

(2) व (३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर साकार प्रशिक्षण केंद्रामध्ये सफाई कामगारांच्या कुटुंबातील सदस्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सुलभ इंटरनॅशनल या संस्थेकडे सोपविण्यात आलेली होती. सदर संस्थेने १९९६-९७ पर्यंत याठिकाणी प्रशिक्षण दिले. परंतु प्रशिक्षण केंद्रास ।ा। चा दर्जा नसल्याने हळूहळू विद्यार्थ्यांची संख्या कती होऊन प्रशिक्षण केंद्र बंद झालेले आहे. सदरील प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यातील सुमारे ११०० आश्रमशाळा निधी अभावी आर्थिक संकटात सापडल्या असल्याबाबत

(78) * u३१२०९ uu**श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), ॲड.के. सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण)ण:ण** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) राज्यातील सुमारे ११०० आश्रमशाळा निधी अभावी आर्थिक संकटात सापडल्या असून शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ सुरू होऊन अडीच महिने होवून गेले तरी आश्रमशाळांतील तब्बल ५ लाख विद्यार्थ्यांना अद्याप वह्या पुस्तके या सारखे शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आश्रमशाळांना खर्चापोटी ३० टक्के आगाऊ रक्कम शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच दिली जाते परंतु चालू शैक्षणिक वर्ष

सुरू झाले असता एकाही रूपयाचे अनुदान वितरीत झाले नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने या गंभीर प्रकरणी कोणती दखल घेतली वा घेण्यात येत आहे,

(4) तसेच सरकारी आश्रमशाळांना मिळणारा खर्च दरमहा प्रत्येक विद्यार्थ्यामागे रूपये ३ हजार दिला जातो परंतु अनुदानित आश्रमशाळांना दरमहा प्रत्येक विद्यार्थ्यामागे रू.९००/- इतका दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(5) असल्यास, अनुदानित आश्रमशाळांवर पडणारा आर्थिक ताण दूर करण्यासाठी शासन अन्य उपाययोजना करणार आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री.विष्णु सवरा : (1) हे खरे नाही.

(2) व (३) अनुदानित आश्रमशाळेच्या परिरक्षण अनुदानासाठी योजनेतर रु.१०६.९२ कोटी व योजनांतर्गतसाठी रु.९०.०७ कोटी असा एकूण रु.१९६.९९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच उर्वरित आवश्यक निधी जिल्हा वार्षिक योजनेतून पुनर्विविनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देणेबाबत कळविले आहे.``

(4) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना जेवण, राहणे, कपडे, शैक्षणिक साहित्य, इत्यादी सुविधा शासनामार्फत मोफत पुरविल्या जातात. अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमागे दरमहा रु.९००/- परिरक्षण अनुदान संस्थांना दिले जाते.``

(5) अनुदानित आश्रमशाळांवर पडणारा आर्थिक ताण दूर करण्यासाठी परिरक्षण अनुदानात वाढ करण्यासाठी मा. मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन करुन निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

---

u

ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(79) * u३१७३६ uu**श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), डॉ.सुनिल देशमुख (अमरावती)**ी:ी सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम**

(सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.आगवणे व श्री.कांबळे यांनी आपल्या निवासस्थानाचे लाखो रुपयांचे विजबिल बांधकाम विभागाच्या खात्यातून भरल्याबद्दल त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच ठाणे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या साहित्य खरेदीत सुमारे ६१ लाख रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी ६ दोषी अधिकाऱ्यांविरुध्द करावयाच्या विभागीय चौकशीमध्ये दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास दोषारोप निश्चित होवूनही अद्यापपर्यंत या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या दोषी अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.

uuu सदर अनियमिततेबाबत दोन्ही अधिका-यांविरुध्द दि. ०६.०७.२०१५ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, त्यास अनुसरुन अपचा-यांनी सादर केलेल्या बचाव निवेदनाव्दारे त्यांचेवरील दोषारोप नाकबूल केल्याने प्रस्तुत प्रकरणी सविस्तर विभागीय चौकशी करण्याकरीता विभागीय चौकशी अधिकारी ी कोकण भवन, नवी मुंबई यांची दि. ०७ सप्टेंबर, २०१५ च्या आदेशान्वये चौकशी आधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

(2) नाही.

uuuu कार्यकारी अभियंता, ठाणे (सा.बां.) विभाग, ठाणे या कार्यालयांतर्गत सन २००९-१० मध्ये एकूण रु. ६१,२१,५८६/- एवढया किंमतीच्या विविध साहित्याच्या खरेदी प्रकरणी निष्पन्न झालेल्या प्रशासकीय अनियमिततेच्या अनुषंगाने सर्व संबंधिताविरुध्द दि. २८ जानेवारी, २०१५ च्या ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असुन, त्यास अनुकरुनण अपचाऱ्यांनी सादर केलेल्या बचाव निवेदनाद्वारे त्यांचेवरील दोषारोप नाकबुल केल्याने प्रस्तुत प्रकरणी सविस्तर विभागीय चौकशी करीता दि. १३ एप्रिल, २०१५ च्या

आदेशान्वये विभागीय चौकशी आधिकारी, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(3) वर नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.
(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

चाकुर (जि.लातूर) येथे नविन शासकीय औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत

(80) * **u३४८५३ uuश्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा)** I: I सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u

(१) चाकुर **(जि.लातूर)** येथे नविन शासकीय औद्योगिक वसाहतीची उभारणी करावी अशी मागणी सदर लोकप्रतिनीधींनी **मा.मुख्यमंत्री** यांचेकडे दिनांक **२७/७/२०१५** रोजी वा त्या सुमारास **केली**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, लातूर येथील शासकीय औद्योगिक वसाहतीमध्ये नवीन उद्योजकांसाठी जागा शिल्लक नसल्यामुळे नवीन उद्योजकांना उद्योग उभारणे शक्य होत **नाही**, हे खरे आहे **काय**,

(३) **असल्यास**, चाकुर हे लातूर रेल्वेस्टेशन तसेच विमानतळ व महामार्ग यांपासून जवळ असल्याने येथे औद्योगिक वसाहत उभारण्यात आली तर या भागाच्या विकासाला गती मिळू **शकेल**, हे खरे आहे **काय**,

(४) **असल्यास**, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) **नसल्यास**, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) होय, हे खरे आहे.
(2), (3) व (४) लातूर जिल्ह्यात लातूर, अतिरिक्त लातूर, अहमदपूर

औसा व निलंगा या ठिकाणी औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली असून त्या ठिकाणी उद्योजकाना uuभूखंड वाटपासाठी शिल्लक आहेत. चाकूर (जि.लातूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी शासकीय तसेच खाजगी जमीन उपलब्ध होऊ शकेल uकाय यासंदर्भात तहसिलदार, चाकूर यांना कळविण्यात आले आहे. त्याचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी भागातील शाळा विनानियंत्रण चालू असल्याबाबत

(81) * u२९७७२ uuश्री.राहुल बोंद्रे (चिखली)ी:ी सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) जळगाव जिल्ह्यातील (ता.जामोद)द आदिवासी भागातील शाळा ह्या विनानियंत्रण चालू असून एक शाळा। तर चक्क बंदच असल्याचे सभापती सौ.सविताताई राऊत यांनी दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी दिलेल्या अचानक भेटीमुळे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, रसलपुर येथील शाळा रेकॉर्ड तपासतांना सभापती, सौ.राऊत, गट समन्वयक चव्हाण व केंद्र प्रमुख यांच्यासमोर शाळेतील अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.

(2) रसलपूर येथे शासकीय वा अनुदानित आदिवासी आश्रमशाळा कार्यरत नाही. बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यामध्ये अनुदानित आश्रमशाळा जळगाव जामोद व हणवतखेड या दोन आदिवासी आश्रमशाळा कार्यरत आहेत.

(3) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासन व फॉक्सकॉन यांच्यामध्ये सुमारे ३५ हजार कोटी

रुपयाच्या गुंतवणूकीबाबत झालेला सामजस्य करार

(82) * u३२४५२ uu**श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व)व:व** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u

(१) **ब्लॅकबेरी**, आयफोन यासारख्या इलक्ट्रॉनिक आणि डिझीटल उत्पादनात जगात अव्वल असलेल्या तैवान येथील फॉक्सकॉन कंपनीचे अध्यक्ष टेरी गाऊ आणि राज्याच्या उद्योग विभागांचे प्रधान सचिव यांच्या सोबत ३५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे ५० हजार रोजगारनिर्मिती करणाऱ्या उद्योगासाठी सामंजस्य करार झाल्याचे दिनांक ८ **ऑगस्ट**, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास **आले**, हे खरे आहे **काय**,

(२) **असल्यास**, फॉक्सकॉन आणि राज्य सरकार यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे थोडक्यात स्वरुप काय **आहे**,

(३) **असल्यास**, सदरहू प्रकल्पाचे कामांस प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात होणार आहे व हा प्रकल्प प्रत्यक्षात केव्हा पासून कार्यान्वित होईल अशी शासनाची धारणा आहे ?

श्री. सुभाष देसाई : (१) होय.
(2) प्रस्तुत उद्योग समवेत झालेला प्राथमिक सामंजस्य करार असून घटकासमवेत वाटाघाटी करुन अंतीम करार झाल्यावर अटी व शर्ती स्पष्ट होतील.
(3) सद्य:स्थितीत प्राथमिक सामंजस्य करार झाला असून घटकाने राज्यात गुंतवणूक करण्यास स्वारस्य दर्शविले आहे. तथापि, याबाबत प्रकल्प गुंतवणूकीसाठी ७ वर्षाचा कालावधी देण्यात आला असून या कालावधीत प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

सदाशिव पेठे, पुणे येथील कल्याणी नागरी पतसंस्थेविरोधात सहकार खात्याकडे तक्रार दाखल झाली असल्याबाबत

u

(83) * u३५४३३ uuश्री.भिमराव तापकीर (खडकवासला) I: I
सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) पुणे - ठेवीची मुदत संपल्यानंतरही पैसे परत न केल्याबद्दल सदाशिव पेठेतील कल्याणी नागरी पतसंस्थेविरोधात सहकार खात्याकडे तक्रार दाखल झाली असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अशा प्रकारे शेकडो ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली असून त्यामध्ये ज्येष्ठांची संख्या सर्वाधिक असून सुमारे तीन हजारांहून अधिक ठेवीदार असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, एकूण जवळपास दोनशे कोटींचा गैरव्यवहार असून, फसवणूक झालेल्यांमध्ये ज्येष्ठांची संख्या ८० ते ८५ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) होय.
(2) सदर संस्थेचा दि. ३१.०३.२०१४ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेतील एकुण ठेवीदारांची संख्या ३७८६ व त्यांच्या ठेवीची रक्कम रु. १२.७५ कोटी आहे.
(3) व (४) जेष्ठांच्या संख्येबाबत निश्चित माहिती उपलब्ध नाही.
uuuu संस्थेचे सन २०१५ अखेरचे लेखापरिक्षण करण्यासाठी शासकीय लेखापरिक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

शेतक-यांच्या कापूस खरेदीपोटी पणन महासंघाकडून मिळणा-या चुका-यातील भांडवल उभारणीचे सुमारे एक कोटी रुपयांचे धनादेश गहाळ झाल्याबाबत

u

(84) * u३२४९७ uuश्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी)ी:ी सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) सन २०१४-१५ मध्ये शेतक-यांच्या कापूस खरेदीपोटी पणन महासंघाकडून मिळणा-या चुका-यातील भांडवल उभारणीचे सुमारे एक कोटी रुपयांचे नऊ हजारांवर धनादेश गहाळ झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास,पणन महासंघाने ८७ लाख ४४ हजार धनादेश छापल्याचे डीएसएस (पुणे) या कंपनीला कळविले असता त्यापैकी ७२ लाख ८१ हजार धनादेशाद्वारे शेतक-यांना चुकारा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रत्यक्ष वाटलेल्या धनादेशांची संख्या, राज्य बैंकेस प्राप्त धनादेश व डीएसएस कंपनीकडे कार्यवाहीसाठी आलेल्या धनादेशांचा एकूण हिशेब विचारात घेतल्यावर ११ लाख धनादेश पणन महासंघास राज्य बैंकेकडून मिळालेलेच नाही, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच बॅक खाते जुळवणीचे काम पुर्ण होत नाही तोपर्यंत या शेतकऱ्यांना तीन टक्क्यांचा निधी देता येत नसल्याने या प्रकरणावर शासनाने कार्यवाही केली आहे काय,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(2) व (३) सन १९७४-७५ ते १९९२-९३ या कालावधीतील १% व ३% प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांना परत करण्यासाठी एकूण ८७ लाख, ४४ हजार इतक्या धनादेशाची डीएसएस (पुणे) या कंपनीमार्फत छपाई करण्यात आलेली आहे. त्यापैकी ७२ लाख, ८१ हजार धनादेशाचे वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेककडून ११ लाख ७९ हजार इतके धनादेश खाते ताळमेळाकरीता महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास अद्यापही प्राप्त झालेले नाहीत. सदर धनादेश खाते ताळमेळाकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघास अद्यापही प्राप्त झालेले नाहीत.

सदर धनादेश उपलब्ध करुन देण्याबाबत कापूस पणन महासंघामार्फत वेळोवेळी महाराष्ट्र सहकारी बँकेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(4) सदर प्रकरणी ज्या शेतकऱ्यांच्या धनादेश खात्याचे ताळमेळ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून करण्यात आलेले नाहीत, अशा शेतकऱ्यांच्या बँक खात्याचे ताळमेळ घालून त्यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(5) शेतकऱ्यांकडून गहाळ झालेल्या धनादेशाचा शोध लागत नसल्यामुळे, सद्यस्थितीत अशा प्रकरणामध्ये शेतकऱ्यांना नविन धनादेश देणे बँक खात्याचे ताळमेळ होईपर्यंत स्थगित ठेवले आहे.

देवरी (जि.गोंदिया) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ते सिंगोरी (जि.भंडारा) येथील फोरलाईन रस्त्याचे कामाच्या दुरावस्थेबाबत

u

(85) * **u३५३८३ uuश्री.संजय पुराम (आमगाव)व:व** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) देवरी (जि.गोंदिया) येथील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ते सिंगोरी (जि.भंडारा) येथील फोरलाईन रस्त्याचे काम पूर्ण झालेले असून येथे पथकर वसुली सुरु झालेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, परंतु रस्त्याची दुरावस्था इतकी झाली आहे की, अपघात होण्याची फार मोठी भिती आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, कंत्राटदाराने सदर रस्त्याच्या दुरावस्थेबद्दल काहीच लक्ष दिले नसल्याने दिवसेंदिवस रस्ता खराब होत असल्याने नागरिकांना त्रास होत असून याबाबत अनेक तक्रारी करुन देखील संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार सदरहू रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नागपूर-रायपूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण

यांचे मार्फत प्रश्नांकित लांबीतील रस्त्याचे काम पुर्ण झाले असून दि. २१.१०.२०१० पासून पथकर वसुली सुरु असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

(2), (3) व (४) सवलतकाराकडून रस्त्याची नियमित देखभाल दुरुस्ती विहित मानकानुसार केली जात असून रस्ता वाहतुकीस योग्य ठेवण्यात आला आहे, त्यामुळे सवलतकारावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नागपूर यांनी कळविले आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात कापसाला आधारभूत किंमत मिळण्याबाबत

u

(86) * u२८५८३ uuश्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर)र:र सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यात कापसाला आधारभूत भाव मिळण्याकरिता शासनाने सादर केलेल्या प्रस्तावाकडे वा शिफारशीकडे केंद्र शासन म्हणजेच कृषि मूल्य आयोग दखल घेत नसल्यामुळे कापसाला आधारभूत भाव मिळत नसून कापूस उत्पादक शेतक-यांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच, राज्यातील मराठवाडा व विदर्भ येथील कापूस या नगदी पिकाच्या शेतकऱ्यांना योग्य दराने भाव प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी एका राजकिय पक्षाचे जनप्रतिनिधी, कृषक सेवा संघ, शेतकरी व कार्यकर्ते तसेच पक्षाचे विविध सेल (विभाग) यांनी लेखी निवेदनाद्वारे दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल व पुनर्वसन),न राज्यमंत्री (महसूल), मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल व मदत), संबंधित महसूली विभागाचे विभागीय आयुक्त, संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, संचालक/उपसंचालक (कृषी) ी यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथराव खडसे : u(१) किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.` कापसासाठी राज्य शासनाने शिफारस केलेल्या किंमतीपेक्षा केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमती कमी आहेत, हे खरे आहे.

(2) अशा प्रकारची निवेदने अनेक लोक प्रतिनिधी, शेतकरी, विविध संस्था, राजकीय पक्ष यांच्याकडून शासनाला प्राप्त होत असतात, हे खरे आहे.

(3) व (४) केंद्र शासनाकडून सर्व राज्यांमध्ये आधारभूत किंमत ये ाजना राबविली जाते.` आधारभूत किंमती केंद्र शासनच जाहिर करते. त्याअनुषंगाने हंगाम २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाचा अभिकर्ता म्हणून सी.सी.आय. नियुक्त आहे.` सी.सी.आय यांनी कापूस पणन महसंघास सबएजंट म्हणून नियुक्त केले आहे.` सी.सी.आय. आणि कापूस पणन महासंघ राज्यात सध्या १२७ केंद्राच्या माध्यमातून कापूस खरेदी करीत आहेत.

---

u

अमरावती-धुळे-नवापूर-सुरत या राष्ट्रीय महामार्ग क्र-६ च्या प्रलंबित कामाबाबात

u

(87) * u२९१२८ uu**श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल)ल:ल** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) अमरावती-धुळे-नवापूर-सुरत या राष्ट्रीय महामार्ग क्र-६ चे दिनांक २४ मे, २०११ रोजी अधिसूचना निघाल्यानंतर मे २०१२ पासून सदर काम तीन वर्षात पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असतांना देखील अद्यापही काम अपूर्णावस्थेत असल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय ,

(2) असल्यास, उक्त राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण न झाल्याने गेल्या सहा महिन्यात याच महामार्गावर केवळ धुळे जिल्हयात २० लोकांचा अपघातात मृत्यू झाला असल्याचे शासकीय आकडेवारीवरुन स्पष्ट

होते, हे खरे आहे काय,
(3)3 असल्यास, ज्या कंपनीशी करार करण्यात आला होता परंतु पुरेशा भूसंपादनाअभावी सदर करार रद्द करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, त्यामुळे या प्रकल्पाची किंमतत पाचशे ते सातशे कोटींनी वाढली आहे, हे सुध्दा खरे आहे काय,
(5) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(6) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अमरावती-धुळे-नवापूर-सूरत या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या चौपदरीकरणाचे काम हे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, भारत सरकार यांच्या अखत्यारीत येते. सदर रस्त्याचे काम दोन भागात विभागण्यात आले होते.
१. अमरावती ते जळगांव लांबी २७५.२२५ कि.मी.
२. जळगांव ते महाराष्ट्र गुजरात बॉर्डर लांबी २०७.०५० कि.मी.
या कामाचा सवलतकरारनामा अनुक्रमे १) मे. एल.ॲन्ड टी.ईस्ट वेस्ट टोलवेज लि. २) मे.ग्रेट ईस्टर्न टोलवेज लिमिटेड यांच्या सोबत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण तर्फे दिनांक ०६.०६.२०१२ रोजी करण्यात आला होता. संबंधित सवलतकरांनी कामे करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे सदर करारनामे दिनांक १०.०९.२०१४ रोजी कामास सुरुवात होण्यापूर्वी रद्द करण्यात आले.
(2) हे खरे नाही,
uuu सदर महामार्गावर झालेले अपघात हे प्रामुख्याने वाहन चालकांनी वाहतुक नियमांचे पालन न केल्याने व निष्काळजीपणे वाहन चालविल्यामुळे झाले असल्याचे पोलीस अधिक्षक धुळे यांनी कळविले आहे.
(3) पुरेशा भुसंपादना अभावी करार रद्द करण्यात आला हे खरे नाही.
(4) सदर निविदा रद्द करुन या कामाचे ३ भागात पुनर्गठन करुन फेरनिविदा मागविण्यात आल्या. फेरनिविदा मागविल्यामुळे १ वर्षाच्या कालावधीत प्रकल्प किंमत रु. १५२०.२१ कोटीने वाढली आहे.
(5) सदर प्रकल्प केंद्रशासनाच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे राज्यशासनाच्या चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(6) या कामाचे खालीलप्रमाणे ३ भाग करण्यात आले आहेत.

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	लांबी कि.मी.	एकुण प्रकल्पाची किंमत (कोटी)
१.	अमरावती-चिखली	१९४	२२८८.१८
२.	चिखली-फागणे	१५०	१८५२.५०
३.	फागणे-गुजरात सीमा	१४०.७९४	१८८५.७४

uuuu वरीलपैकी अमरावती ते चिखली तसेच फागणे ते गुजरात बॉर्डर ह्या कामांचे करारनामे अनुक्रमे १) मे. अमरावती चिखली एक्सप्रेसवे लिमीटेड २) मे. फागणे सोनगढ एक्सप्रेसवे लिमिटेड या कंपनीसोबत दिनांक ०८.०९.२०१५ ला करण्यात आले. इतर आवश्यक बाबींची पुर्तता करुन मार्च २०१६ मध्ये प्रत्यक्ष कामास सुरु होण्याची शक्यता असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

uuuu तसेच चिखली-फागणे या भागाच्या कामाची निविदा मागविली असता त्यास प्रतिसाद मिळाला नाही व निविदा संबंधी पुढील कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या स्तरावर सुरु आहे, असेही प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

---

u

आष्टी (जि.बीड) येथे शेतकऱ्यांनी सातबाऱ्यावरील नोंद रद्द करण्याची मागणी केल्याबाबत

u

(88) * **u३५०७४ uuश्री.सुरेश धानोरकर (वरोरा) T: T** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) आष्टी (जि.बीड) येथे औद्योगिक क्षेत्राची स्थापना करुन एमआयडीसी करिता स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी अधिग्रहित करण्यात आल्या असून त्यांच्या सातबाऱ्यावर भूसंपादनाची नोंद करण्यात आली असली तरी सहा वर्षे उलटूनही अद्यापही भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, यामुळे प्रकल्पग्रस्तत शेतकऱ्यांना अद्यापही कोणताच मोबदला मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांनी सातबाऱ्यावरील नोंद रद्द करण्याची मागणी या शेतकऱ्यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास

जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(4) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१), (2) व (३) आष्टी (जि.बीड) येथे लघु औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्यात आली असून तेथे पाणी-पुरवठा व रस्त्यासाठी ०.८७ हे. आर. इतके क्षेत्र संपादीत करण्यासाठीची अधिसूचना निर्गमित झालेली होती. तथापि, या पाणीपूरवठा योजनेसाठी आवश्यक असलेली ०.०६ हे. आर. इतकी जमीन संबंधीत शेतकऱ्यांकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने खरेदी केलेली आहे व उर्वरित जमीन महामंडळास आवश्यक नसल्याने जमीन संपादीत करण्याची अधिसूचना रद्द करावयाची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे संबंधीत शेतकऱ्यांना मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(4) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

कोळेवाडी (ता.कराड, जि.सातारा) गावांतर्गत विस्तारीत गाव जोड ओढ्यावरील पुलाचे काम अपूर्णावस्थेत अवस्थेत असल्याबाबत

u

(89) * u२९४८२ uu**श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर)र:र** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) कोळेवाडी (ता.कराड, जि.सातारा) गावांतर्गत विस्तारीत गाव जोड ओढ्यावरील पुलाचे काम गत तीन महिन्यांपासून अपूर्ण अवस्थेत असल्याने ग्रामस्थांच्या रहदारीचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त पुलाचे काम त्वरीत पूर्ण करण्यासाठी कोणती

कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
u
श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.
uuuu कोळेवाडी ते कुसूर या पाणंद रस्त्यावरील (जुना कराड-ढेबेवाडी रस्ता) कोळेवाडी (ता.कराड,जि.सातारा) गावानजीक ओढ्यावर पुलाचे काम मंजूर नसून ते १२०० मि.मी. व्यासाच्या तीन ओळोचे मोरी बांधकाम करण्याचे काम सुरु आहे.
(2) प्रश्नाधिन मोरी बांधकामाचे काम हे कोळेवाडी गावानजिक असून जागेच्या अडथळ्यामुळे विहित कालावधीत पूर्ण होवू शकलेले नाही.ी सद्यस्थितीत सदर कामावरील मोरीसाठीच्या पाईपचे व कॉक्रिटचे काम पूर्ण झाले असून दोन्ही बाजुकडील भरावाचे काम प्रगतीपथावर आहे.` सदरील काम हे दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(3) प्रश्न उद्भ्वित नाही.

राज्यातील बहुतांश घाट आणि महामार्ग प्रवासाच्या दृष्टीने असुरक्षित असल्याबाबत

(90) * u२९६७० uu**प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम)म:म** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) राज्यातील बहुतांश घाट आणि महामार्ग प्रवासाच्या दृष्टीने असुरक्षित बनलेले असून राज्यातील १२ राष्ट्रीय महामार्ग आणि २९१ राज्य महामार्गावर दरवर्षी सुमारे ३४ हजार लहान मोठे अपघात होत असल्याची नोंद राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागात असून या दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राज्य शासन व केंद्र शासन यांच्या यंत्रणामार्फत करावयाच्या असतात, हे खरे आहे काय,
(2) तसेच अशा घाटरस्त्याच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासनाच्या नैसर्गिक

आपत्ती निधीतून महाराष्ट्र शासनास सुमारे ४५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होत असतो, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त घाट आणि महामार्ग यावरील होणाऱ्या अपघातांचा आढावा घेण्यात आला आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आलेले आहे व त्या अनुषंगाने कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत अथवा येत आहेत,

(4) तसेच घाट आणि महामार्गाच्या दुरुस्तीसाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारा ४५०० कोटी रुपयांचा निधी राज्यशासनास मिळावा यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहे,

(5) निधी प्राप्त झाला असल्यास त्याचा विनीयोग कशाप्रकारे करण्यात आला आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) गृहविभागाने दिलेल्या माहितीनुसार सन २०१४ मध्ये राज्यमार्गावर ११३८७ अपघात झाले असून राष्ट्रीय महामार्गावरर ९३०३ एवढे अपघात झाले आहेत.त सन २०१५ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत राज्यमार्गावर ९३६६ व राष्ट्रीय महामार्गावर ७२६५ अपघात झाले आहेत.अपघात प्रवणक्षेत्राच्या ठिकाणी आवश्यक त्या तात्पुरत्या तसेच कायमस्वरुपी उपाययोजनाची कार्यवाही निधी उपलब्धतेनुसार संबधित यंत्रणेमार्फत करण्यात येतात.

(2) राज्यशासनाच्या अधिनस्थ रस्त्यावरील घाट दुरुस्तीसाठी केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निधीमधून निधी प्राप्त झाला नाही.

(3) राज्यशासनाने स्थापित केलेल्या अपघात निवारण समितीने निश्चित केलेल्या ६४४४ स्थळांपैकी ६१६५ स्थळांची दुरुस्ती करण्यात आली आहे. सन २०१५-१६ पासून रस्ते दुरुस्तीसाठी प्राप्त होणा-या निधीतून ५% टक्के एवढा निधी रस्ते सुरक्षा कामांसाठी राखीव ठेवण्यात आला असून त्यातून रस्ते सुरक्षा बाबतची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

गृहविभागामार्फत अवैध पोलीस वाहतूक, दारु पिऊन वाहन चालविणे इत्यादीबाबत मोटार वाहन कायद्यान्वये अन्वये दंडनीय कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील महामार्गावर वाहतूकीचे नियमन व अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी महामार्ग पोलीस विभागाचे एकूण ६३ महामार्ग पोलीस केंद्र कार्यरत आहेत.

(4) व (५) राज्यमार्गावरील रस्ते व घाट दुरुस्तीसाठी केंद्रशासनाकडून कोणताही निधी प्राप्त झाला नाही.

समाजकल्याण विभागाच्या वरळी (मुंबई) येथील विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतीगृहात निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याबाबत

(91) * u३२१०५ uu**श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर)र:र** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) समाजकल्याण विभागाच्या वरळी (मुंबई) येथील विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतीगृहात विद्यार्थ्यांना देण्यात येणारा नाश्ता, भोजन यामध्ये सडक्या व किडक्या अन्नधान्य व भाजीपाल्याचा समावेश होत असल्याने जेवणाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याबाबतचा तसेच ठेकेदार श्री. अशोक पिंपरकर यांचेविरुध्द विद्यार्थ्यांनी तक्रारी करुनही ठेकेदाराविरुध्द कारवाई होत नसल्याच्या असंख्य तक्रारीही मुंबई विभागाचे अधिकारी श्री. एम.एस. शेरे यांनी मिळाल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मान्य केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी विद्यार्थ्यांनी तक्रारी करुनही उक्त मुंबई विभागाचे अधिकारी यांनी या संदर्भातील लेखी अहवाल विभागीय आयुक्त, समाजकल्याण विभाग यांचेकडे पाठविण्यास हेतूत: दिरंगाई केली, हे खरे आहे काय,

(3) नसल्यास,सअधिकारी यांनी ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा वरिष्ठांकडे लेखी अहवाल कधी पाठविला, नसल्यास, अहवाल पाठविण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(4)4तसेच विद्यार्थ्यांच्या तक्रारींना न्याय मिळवून देण्यास व ठेकेदारावर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१) दि. २७.४.२०१५ च्या पत्राद्वारे तक्रार करण्यात आली होती.

(2) नाही.

(3) सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर यांच्या दिनांक ३०/४/२०१५ च्या पत्रान्वये भोजन ठेका बदली करण्याबाबत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई यांना प्रस्ताव सादर केलेनुसार भोजन ठेकेदार बदलण्यात आला आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

एमआयडीसी, धुळे येथील भुखंड वाटपात झालेला गैरव्यवहार

u

(92) * u३३५६६ uuश्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर)र:र
सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) एमआयडीसी धुळे येथील भूखंडाची गैरमार्गाने झालेल्या वाटपासंदर्भात चौकशी करुन दोषी व्यक्तीविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. २९/०१/२०१५ रोजी व तदपूर्वीही अनेक वेळा मा.मंत्री, सचिव, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अदयापी कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, गेल्या ३ वर्षात एमआयडीसी (धुळे) भूखंड वाटपात गैरव्यवहार झाल्याचे सिध्द होऊनही सदर प्रकरणातील दोषी व्यक्तीवर फौजदारी कारवाईस विलंब होण्याची काय कारणे आहेत,
(3) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने` चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तदनुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) होय, अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे. या निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार स्थानीक लोकप्रतिनिधींनी श्री. नरेश मुणोत या व्यक्तीस ४० ते ४५ भूखंडाचे बेनामी वाटप करण्यात आल्याची व श्री. मुणोत, श्री. विवेक सोनवणे, श्री. राजेंद्र सिसोदीया, श्री. राजू वाघ, श्री. नितीन देवरे, श्री. सुनिल पाटील यांना प्रत्येकी २०/२० भूखंडाचे वाटप करण्याबाबत केलेली तक्रार वस्तुस्थितीवर आधारीत नसल्याचे आढळून आलेले आहे.
(2), (3) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मुंबई शहरातील लोअर परळ येथील मधुसदन गिरणीची जमीन कमी भावाने विक्री केल्यामुळे शासनाला नुकसान झाल्याबाबत

u

(93) * u२९५५६ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी)ी:ी सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) मुंबई शहरातील लोअर परळ येथील मधुसदन गिरणीची जमीन कमी भावाने विक्री केली असून त्यात शासनाला ५७७ कोटीचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच जमिनीवर गिरणी कामगारांना घरे देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) नाही.

uuu मधुसदन गिरणी ही केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाची गिरणी असून सदर जमिनीची विक्री करण्यात आलेली नाही. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या २२.७.२००८ च्या आदेशानुसार सेटलमेंटद्वारे मुळ मालकास बी.आय.एफ.आर., राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाचे संचालक मंडळ व केंद्र शासनाच्या मान्यतेने एकूण जमिनीच्या ३५ टक्के जमिन देण्यात आली आहे.

(2) प्रश्न उद्भभवत नाही.

(3) प्रश्न उद्भभवत नाही.

---

u

नाशिक येथील आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृहातील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत

u

(94) * u३१११२ uu**श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री)ी:ी** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) नाशिक येथील आदिवासी आश्रमशाळा व वसतीगृहे येथे शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे आदिवासी विद्यार्थ्यांना सुविधा देण्याबाबत शासन अपयशी ठरल्याने संबंधित अधिकारी या मुलांना भोजनाऐवजी रोख भत्ता देवून जबाबदारी झटकण्याच्या प्रयत्नात आहेत, हे खरे आहे काय,

(2) तसेच, गेल्या चार महिन्यापासून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शालेय स्टेशनरी मिळाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. विष्णु सवरा : (१) हे खरे नाही.

uuuuuu आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय वसतीगृहात ठेका पध्दतीने भोजन व्यवस्था सुरु आहे. तसेच शासकीय आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांमार्फत भोजन तयार करुन देण्यात येत आहे. तसेच अन्य देय सुविधाही देण्यात येत आहे.

(2) व (३) विद्यार्थ्याचा निर्वाह भत्ता त्यांच्या बँक खात्यावर दरमहा जमा करण्यात येत आहे. नाशिक येथील वसतीगृहातील विद्यार्थ्याना माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यतचा निर्वाह भत्ता अदा करण्यात आलेला आहे. तसेच शैक्षणिकक साहित्याची खरेदी अनुक्रमे मुख्याध्यापक व गृहपाल/गृहप्रमुख यांच्या स्तरावरुन करुन विद्यार्थ्याना साहित्याचे वाटप करण्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

राज्यातील मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

u

(95) * u२८४३६ uuश्री.छगन भुजबळ (येवला) I: I सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यस्तरीय मुकबधीर असोसिएशन या संघटनेने आपल्या विविध मागण्यांसाठी दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास अपंग कल्याण आयुक्तालयासमोर धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(2) तसेच सदर संघटनेच्या विविध मागण्यांवर कार्यवाही करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्यातील मुकबधीर शासकीय कर्मचाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाड्यातील निर्देशानुसार वाहतूक भत्ता अदा करण्यासाठी दिनांक १० ऑगस्ट २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात सुधारणा करणेची लोकप्रतिनिधींनी दि. २७ ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, प्रश्न भाग (१), (2) व (३) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजकुमार बडोले : (१), (2) व (३) होय हे खरे आहे.

(4) प्रश्न भाग (१) व (२) मध्ये नमूद केल्यानुसार राज्यस्तरीय कर्णबधिर असोसिएशन, परभणी यांनी एकूण ११ मागण्या आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचेकडे सादर केलेल्या होत्या. त्या अनुषंगाने आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी इयत्ता १२ वी पर्यंत सांकेतिक भाषेमध्ये शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत सर्व संबंधित विभाग तसेच सदर संघटनेसमवेत दि.४.८.२०१५ रोजी बैठक घेतलेली आहे. अपंग कल्याण आयुक्त यांना अपंग अधिनियम,१९९५ मधील तरतुदीनुसार असलेल्या अर्ध न्यायिक अधिकारातंर्गत उपरोक्त मागण्यांपैकी तीन प्रकरणात तक्रार दाखल करुन त्या न्यायाधिकरणात सुनावणी सुरु आहे. तसेच संघटनेच्या इतर मागण्यांबाबत संबंधित विभागांना आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याबाबत अपंग कल्याण आयुक्तालयाकडून कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रश्नातील uप्रश्न भाग (३) च्या अनुषंगाने

वित्त विभागाकडून आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

मंत्रालयाचे नुतनीकरण केल्यानंतरही इमारतीचे छत कोसळल्याबाबत

u

(96) * u२८४०० uu**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), ॲड.वारीस पठाण (भायखळा)** I: I सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मंत्रालयाला आग लागल्यानंतर मुख्य इमारतीच्या दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ जुलै,२०१४ रोजीपासून मे.युनिटी इन्फ्रा या कंपनीला मुदतवाढ देण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) तसेच नूतनीकरणावर तब्बल २१५ कोटी ५५ लाख रुपयांचा खर्च करण्यात येऊनही दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालयातील छताचा काही भाग कोसळण्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर घटनेच्या चौकशीचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदरहू चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर प्रकरणातील दोषींवर शासनाकडूनन कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(5) तसेच सदर कंपनी नुतनीकरणाचे काम केव्हापर्यंत पूर्ण करणार आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) हे खरे आहे.

(2) मंत्रालय नुतनीकरणाच्या कामावर आतापर्यंत रु. २१५.३० कोटी इतका खर्च झाला आहे. दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी सहाव्या

मजल्यावरील दक्षिण भागातील मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयातील आभासी छताचा (Gypsum false celling) काही भाग (अंदाजे ४ ते ५ चौ.मी.) सरकले असल्याचे आढळून आले आहे. परंतु छताचा काही भाग कोसळण्याची घटना घडली आहे, हे खरे नाही.

(3) हे खरे आहे.

(4) चौकशी समितीच्या शिफारशीबाबत वेगळी कार्यवाही करण्यात येत आहे.` तथापि या घटनेकरीता कोणीही दोषी नसल्यामुळे दोषीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भ्वत नाही.

(5) मे. युनिट इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीकडून मंत्रालय मुख्य इमारतीचे दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम मे, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्यातील माणगावातून जाणा-या कोकण रेल्वेमार्गावर दोन उड्डाणपुल वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक झाल्याबाबत

u

(97) * u३०४७१ uuश्री.भरतशेठ गोगावले (महाड)ड:ड सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) रायगड जिल्ह्यातील माणगावातून जाणा-या कोकण रेल्वेमार्गावर दोन उड्डाणपुल वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक झाल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त अरुंद उड्डाणपुलावरुन कोणतेही अवजड वाहन गेल्यास कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त अरुंद पुलावरुन मोठे ट्रक अथवा ट्रेलर आदी वाहने जाऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(4) तद्नुसार उक्त उड्डाणपुलाची रुंदी वाढविण्याबाबत/दुरुस्तीबाबत शासनाने काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) प्रश्नाधिन पूल रेल्वेच्या अखत्यारित आहेत. त्याची देखभाल दुरुस्ती रेल्वे विभागामार्फतच करण्यात येते,
(2) अशी बाब नाही.
(3) अशी बाब नाही.
(4) पूल रेल्वे विभागाचे आहेत. त्यामुळे राज्य शासनाच्या अखत्यारीतील बाब नाही.
(5) भाष्य नाही.

---

u

जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी शासकीय कार्यालय, शासकीय निवासस्थाने दुरुस्तीच्या नावाखाली गैरव्यवहार केल्याबाबत

u

(98) * u३३१६७ uuश्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अर्जुन खोतकर (जालना) I: I सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) जालना येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी शासकीय कार्यालय, शासकीय निवासस्थाने दुरुस्तीच्या नावाखाली कामे न करता कोट्यवधीची देयके उचलून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने ९८३ गोपनिय दस्तावेज असलेली मेजरमेंट बुक गहाळ झाले असल्याचे` निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन कारवाई करण्याच्या मागणीसाठी कंत्राटदार शेख मुसा यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासूनन जिल्हाधिकारी ी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.

सा.बां. विभाग जालना यांचेकडील मोजमाप पुस्तिका गणतीनुसार ७९७ मोजमाप पुस्तिकांची तफावत आढळून आली आहे.
(2) हे खरे आहे.
(3) व (४) सा.बां. विभाग जालनाकडील मोजमाप पुस्तिकांचा पुन:श्च आढावा घेण्याचे` काम मुख्य अभियंता, सा.बां.प्रा.विभाग, औरंगाबाद यांना सोपविण्यात आले असून कार्यवाही प्रगतीत आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर रस्ता चौपदरीकरणाच्या अर्धवट असलेल्या कामाबाबत

(99) * u२८३६४ uu**श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय कदम (दापोली)ी:ी** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील चौपदरीकरणाच्या अपूर्ण असलेल्या कामामुळे गेल्या पाच वर्षात ८ हजार अपघात व त्यामध्ये १८६८ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(2) तसेच या महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर या ८४ किलोमीटर मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेल्या ५ वर्षांपासून अपूर्ण स्थितीत आहे आणि खड्डयांचे प्रमाण सर्वाधिक असल्याने अपघातांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(3) तसेच या मार्गावर कशेडी रस्त्याच्या दोन्ही बाजुकडे रस्त्याच्या दुतर्फा साईडपट्टयांवर वाढलेल्या उंच गवतामुळे व हिवाळ्यात पडणाऱ्या धुक्यामुळे रात्रीच्या व पहाटेच्या वेळी दूरवरचे दिसत नसल्याने वाहन चालवणे अत्यंत धोकादायक झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, प्रश्न भाग २ मधील रस्त्याचे काम तात्काळ सुरु करण्यात येईल असे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.रस्ते वाहतूक मंत्री, भारत सरकार यांचे समवतेच्या बैठकीत आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,
(5) तसेच पनवेल-इंदापूर-झाराप द्रुतगती मार्गासाठीची भूसंपादन प्रक्रिया

अपूर्ण असल्याने यासंदर्भात केंद्र शासनाकडे राज्य शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा केला आहे काय व उक्त प्रश्न भाग ४ मधील आश्वासनानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास,स विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत पाटील : (१) व (२) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र ६६ (जुना क्र १७)७ वरील पळस्पे ते इंदापूररर (कि.मी. ०/००० ते कि.मी.ी ८४/०००) या लांबीचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत मागील ४ वर्षांपासून सुरु असून, अदयापि अपूर्ण आहे.` तथापि,ि सदर लांबीमधील पावसाळयात पडलेले` खड्डे भरुन रस्ता वाहतूकीस योग्य ठेवण्यात आल्याचे` प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेलल यांनी कळविले आहे.

u रस्त्याच्या या लांबीमध्ये सन २०१० पासून ऑक्टोबर २०१५ पर्यंत ६९४९ अपघातांमध्ये` १४९७७७ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच अपघात मुख्यत: वाहन चालकाने वाहन भरधाव वेगाने, अविचाराने व हयगयीने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष। करुन चालविल्यामुळे` झ ालेले असल्याचे पोलीस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्रराज्य, मुंबई यांनी कळविले आहे

(3)3 सदर लांबीतील रस्त्यांच्या दोन्ही बाजूकडील पावसाळ्यात वाढ झ ालेले गवत काढण्यासाठी सवलतकारास सूचना देण्यात आलेल्या आहेत. सवलतकारामार्फत गवत काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. वाढलेल्या गवतामुळे अपघाताचे प्रमाण वाढल्याची कुठलीही घटना निदर्शनास आलेली नाही, असे प्रकल्प संचालक,पनवेल यांनी कळविले आहे.

(4) मा. मंत्री, रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालय, भारत सरकारर वव मा. मंत्री सा.बां.वि., महाराष्ट्र यांच्या दि. ३.६.२०१५ रोजी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये सदर कामम सवलतकारास दिलेल्या दिनांक ३१.३.२०१६ पर्यंतच्या। वाढीव मुदतीत पूर्ण करण्याचे प्रयत्नन राहतील असे जाहिर केल्याचे प्रकल्प संचालक,क भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणणण पनवेल यांनी कळविले आहे.

(5) पनवेल ते इंदापूरर या लांबीतील भूसंपादनासाठी आवश्यक निधी भूसंपादनन अधिका-यांकडे` जमा केला असल्याचे` प्रकल्प संचालक,

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण पनवेलल यांनी कळविले आहे.` इंदापूर ते झाराप या लांबीतील भूसंपादन प्रक्रिया सुरु असून संयुक्त मोजणीचे काम सुरु आहे.` प्रत्यक्ष निवाडा जाहिर झाल्यावर व जमिनीचे मूल्यांकन उपलब्ध झाल्यानंतर, बाधितांना अदा करावयाच्या निधीची मागणी केंद्र शासनाकडे` करण्यात येईल.

(6) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेल्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता शासनाने गठीत केलेल्या समितीबाबत

u

(100) * u३०८५६ uu**श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय सावकारे (भुसावळ), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा)** I: I सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) सन २०१२ मध्ये आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेल्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरिता दिनांक १५ एप्रिल, २०१४ रोजी शासनाने गठीत केलेल्या समितीला दीड वर्षांहून अधिक कालावधी होऊनही व त्यावरील झालेला खर्च सव्वा ते दीड कोटी रुपये होऊनही सदर गैरव्यवहाराची चौकशी पूर्ण झाली नसल्याची बाब दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या समितीचे अध्यक्ष व कर्मचारी तसेच चौकशी समितीची बाजु मांडणाऱ्या वकीलांचे मानधन, अध्यक्षांचा वाहन खर्च, ऑफिस व अन्य खर्च यावर आत्तापर्यंत किती रुपये खर्च करण्यात आले व चौकशीचे काम किती प्रमाणात पूर्ण झाले आहे,

(3) या खरेदीत झालेला आर्थिक घोटाळा अंदाजे किती रुपयांचा आहे,

(4) सदर चौकशीमध्ये अंगणवाड्या पोषण आहार योजनेतील

गैरव्यवहार, आश्रम शाळेतील मुलांसाठी चटई व गादीची खरेदी, डिझेल इंजिन खरेदी, गॅस शेगड्या पुरवठा योजना, लघु उपसा सिंचन योजना, सायकल दुकान योजना, किराणा माल दुकान योजना, गृह उपयोगी भांड्यांचा पुरवठा इ. गैरव्यवहारांची चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१) व (२) सन २००४-०५ ते सन २००८-०९ या कालावधीत आदिवासी विकास विभागाकडून करण्यात आलेल्या विविध योजनांच्या खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणे तसेच संबधीतांविरोधात कारवाई करण्याची शिफारस करणे व भविष्यात अशा घटना घडू नये याकरीता उपाययेाजना सुचविणेसाठी शासन निर्णय दिनांकक १५ एप्रिल,२०१४ अन्वये मा. श्री. एम.जी. गायकवाड, (सेवा निवृत्त न्यायमुर्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय चौकशी समिती गठित केलेली आहे. सदर समितीवरर रुपये १.१७ कोटी इतका खर्च झालेला असून समितीचे कामकाज सुरु आहे. (3), (4) व (५)५ चौकशी समितीचे कामकाज सुरु असून अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही.ीीीीीीी

मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर दरड कोसळल्याने पाच जणांचा मृत्यू झाल्याबाबत

u

(101) * u३००७४ uu**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद)द:द** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आडोशी बोगदा व खंडाळा बोरघाटामध्ये माहे जुलै व ऑगस्ट, २०१५ मध्ये तीन वेळा दरड कोसळल्याने ५ जणांचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच परतीच्या पावसाचा परिणाम होऊन मावळ तालुक्यातील जुना पुणे-मुंबई रस्ता (एन.एच.४) व पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाला जोडणाऱ्या उर्से खिंडीतील खडकांना भेगा पडल्याने अनेक दगड निसरडे झाल्याने यापुर्वी दरड कोसळून या मार्गावरील वाहतुक बंद झाली होती, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरहू महामार्गालगतच्या संपूर्ण डोंगरालाच बाहेरून आणि अंतर्गतही उभ्या भेगा असल्याने दरडी रोखणे हे आव्हानच असल्याचे आयआयटी मुंबईच्या भूविज्ञान संशोधक टी.एन.सिंग व त्यांच्या सहकारी संशोधकांनी सर्वेक्षण केल्यानंतर स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे तसेच उपरोक्त दुर्घटनेत मृत्यूमुखी पावलेल्या व्यक्तींना शासनाने कोणती आर्थिक मदत केली,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

u

श्री. एकनाथ शिंदे : (१) अंशत: खरे आहे. यामध्ये ३ व्यक्तींचा मृत्यु झाला आहे.

(2) अंशत: खरे आहे.

(3) अशाप्रकारचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(4) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाट येथे दरड कोसळणाऱ्या प्रवण क्षेत्रामध्ये भूभागाचे तांत्रिक संशोधन तज्ञामार्फत करण्यात आले आहे. तसेच कायमस्वरुपी उपाययोजना करणेकरीता मेकॅफेरी एनव्हायरमेंटल सोल्युशन्स प्रा.लि.याचेशी दि.२५.०९.२०१५ रोजी रु.३३.०० कोटी रक्कमेकरीता करारनामा करुन काम वर्ग करण्यात आले आहे. सदर काम सद्यस्थितीत प्रगतीत आहे.

तीन मयतांच्या वारसांना रु.४ लक्ष प्रत्येकी आर्थिक मदत शासनाने केली आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

---

u

धुळे जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत कार्यालयात १५० कोटी रुपयांचा झालेला अपहार

u

(102) * u२९००१ uu**श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), अॅड.के. सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर)र:र** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) धुळे जिल्ह्याच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आदिवासींच्या कल्याणासाठी सन २०१२ पासून ते २०१५५ या आर्थिक वर्षापर्यंत शासनाकडून आलेला १५० कोटींचा निधी प्रकल्प कार्यालयाने खर्च केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत कार्यालयाच्या काही अधिकाऱ्यांनी तब्बल १४८ कोटी ९६ लाख रुपये निधी तीन वर्षे नियमबाह्य पध्दतीने कार्यालयाच्या नावे स्वतंत्र खाते उघडून निधी दडपून ठेवला असल्याचे जिल्हाधिकारी यांनी केलेल्या विशेष लेखा परीक्षणामुळे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर आर्थिक अपहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास,चौकशीत काय आढळून आले व दोषी आढळणा-यांवर आतापर्यंत काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा : (१)१ होय,ययहे` अंशत: खरे` आहे.

uuuu जिल्हाधिकारी, धुळे कार्यालयाच्या तपासणी पथकाने प्रकल्प अधिकारी, धुळे यांच्या कार्यालयात माहे जून, २०१५ मध्ये केलेल्या तपासणीत सन २०१२-१३३ या वर्षापासूनन नमूद केलेला प्राप्त तथा अखर्चित निधी ी लगतच्या वर्षात खर्च करण्यात आला आहे.` सदर तपासणी पथकाला ा माहे मे, २०१५ अखेर रु.२७,६४,६२,९९५/- इतकाच निधी अखर्चित असल्याचे` निदर्शनास आले आहे.`या उर्वरित अखर्चितत निधीचा विनियोग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(2) हे खरे नाही.
uuuu सदर अखर्चित निधी ी प्रकल्प कार्यालय, धुळे यांच्या स्टेट बँक,क धुळे येथे असलेल्या ा शासकीय खात्यात जमा आहे.
(3)3वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या अखर्चित निधीच्या ा बातमीच्या अनुषंगाने अपर आयुक्त, नाशिक यांना चौकशी करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.
(4)4व (५)५५प्रश्न उद्भ ावत नाही.

औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद या चार जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांकडे १९५ कोटीची रक्कम भूसंपादनांसाठी उपलब्ध करून देण्याबाबत

u
(103) * u३५६४८ uuश्री.बसवराज पाटील (औसा) T: T सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u
(1) दक्षिण आणि उत्तर भारताला तसेच सुरत ते नागपूर या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ ला जोडणाऱ्या सोलापूर- धुळे या राष्ट्रीय महामार्गाला मंजूरी देण्यात आली असून सदरहू महामार्गांचे अ) सोलापूर-येडसी ब) येडसी-औरंगाबाद व क) औरंगाबाद- धुळे असा एकूण ४५० किमी अंतराचा महामार्ग ३ टप्प्यात करण्याचे योजिले असून या महामार्गांच्या भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे, हे खरे आहे काय
(2) औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबादद या चार जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांकडे १९५ कोटीची रक्कम भूसंपादनांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(4) सदरहू जिल्हयाधिकाऱ्यांकडे भूसंपादनासाठी प्राप्त झालेल्या १९५ कोटीपैकी केवळ ८० कोटीची रक्कम संबंधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आली असून उर्वरित रक्कम जिल्हाधिकाऱ्याच्या तिजोरीत पडून आहे, हेही खरे आहे काय
(5) सदरहू राष्ट्रीय महामार्गांसाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या संपादनास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथराव खडसे : (१) हे खरे आहे.
(2) अंशत: खरे आहे.
uuuu औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद या चार जिल्ह्यातील भुसंपादनासाठी रु. ४६४.०६ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.
uuuu जिल्हानिहाय भुसंपादनासाठी प्राप्त निधी पुढील प्रमाणे आहे. औरंगाबाद रु. ७७.८२ कोटी, जालना ५७.५१ कोटी, बीड ४४.५२ कोटी व उस्मानाबाद २८४.२१ कोटी,
(3) औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद या चार जिल्ह्यातील एकूण १२७ गावापैकी ९९ गावांचे निवाडे घोषित करण्यात आलेले आहेत व उर्वरित गावांचे निवाडे घोषित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(4) औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद या चार जिल्ह्यातील भूसंपादनांसाठी रु. ४६४.०६ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यापेकी २०८.०५ इतक्या रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे.रू.२५६.०१ कोटी इतकी रक्कम शिल्लक असून त्याच्या वाटपाची कार्यवाही सुरु आहे.
(5) सर्व साधारण कारणे पुढील प्रमाणे.

अ) मालकी हक्का संबंधी वाद.

ब) संयुक्त मोजणी अहवालात संयुक्त खातेदार व ७/१२ उताऱ्यामध्ये दशविलेले वेगवेगळया क्षेत्रफळामुळे हितसंबंधितांचे क्षेत्र किती संपादित झाले या मध्ये तफावती असल्याने व हितसंबंधितांनी ताब्या बाबत मा. न्यायालयात दाखल प्रकरणे इत्यादी कारणांनी संपादित जमिनीचा मावेजा अदा करण्यास विलंब झालेला आहे.

क) मोजणी बाबत तक्रारी प्राप्त होत असल्याने फेर मोजणी करावी लागते.` u

---

यवतमाळ जिल्ह्यातील नागपूर रोडलगत असलेल्या गुरुलक्ष्मी टेक्सटाईल कंपनीला आग लागल्याबाबत

(104) * u२९६१२ uuश्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी)ी:ी सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
u(1) यवतमाळ जिल्ह्यातील नागपूर रोड लगत असलेल्या गुरुलक्ष्मी टेक्सटाईल कंपनीला सकाळी १० च्या सुमारास अचानक आग लागून

आगीमध्ये अनेक मशीन, उत्पादीत साहित्य जळून नष्ट झाले असल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरील दुर्घटना टाळण्यासाठी या ठिकाणी पाण्याची कुठलीही व्यवस्था नसल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आगीच्या दुर्घटना टाळण्याबाबत तसेच सदरील परिसरात पाण्याची सोय करण्याबाबत व नुकसान झालेल्या कंपनीला नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) होय.

यवतमाळ जिल्ह्यातील नागपूर रोडवरील डोळंबा येथील गुरुलक्ष्मी कोटेक्स प्रा.लि. हा कारखाना केंद्र शासनाचा वाणिज्य आणि उद्योग विभागांतर्गत नोंदणीकृत कारखाना असून सदर कारखान्यामध्ये दि. २२./०९/२०१५ रोजी सकाळी १०.०० च्या सुमारास अचानक आग लागून आगीमध्ये मशीनरी, कच्चा माल जळून खाक झाल्याचे निदर्शनास आले` आहे.

(2) हे खरे आहे.

uuuuu कारखान्यात आग विझविण्यासाठी पाण्याची १ लाख लिटर क्षमतेची एक भूमीगत टाकी तसेच ४० हजार लिटर क्षमतेच्या दोन ओव्हरहेड टाक्या उपलब्ध आहेत. तसेच १४ फायर हायड्रन्ट पॉइन्टस, एक इलेक्ट्रीक पंप इत्यादी यंत्रणा उपलब्ध असल्याचेही आढळून आले असून पाण्याची कुठलीही व्यवस्था नव्हती अशी वस्तुस्थीती नाही.

(3) व (४) या प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीअंती सदर कारखाना विना परवाना सुरु असल्याचे आढळून आले असून त्यामुळे तसेच आगीच्या घटनेची माहिती औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास विहित वेळेत न कळविल्याने भोगवटादारा विरुध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

uuuuu तसेच गुरुलक्ष्मी कोटेक्स प्रा.लि. या कंपनीने एस.बी.आय. जनरल इंश्युरन्स कंपनीकडे विम्यासंदर्भातील दावा सादर केला असल्याचेही चौकशीत आढळून आले आहे.

uuuu अशा प्रकरणात शासन स्तरावरुन नुकसान भरपाई देण्याबाबत कोणतीही तरतुद नाही.

---

u

चिंचोडी (ता.येवला जि.नाशिक) येथील नवीन औद्योगीक क्षेत्र विकसित करणेबाबत

u

(105) * u२८४५२ uuश्री.छगन भुजबळ (येवला) I: I सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) चिंचोडी (ता.येवला जि.नाशिक) येथील नवीन औद्योगीक क्षेत्र विकसित करण्यासाठी संपादित औद्योगिक क्षेत्राच्या आराखड्यास मंजुरी देणे व पायाभूत सोयीसुविधांना I प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे मंजुरीसाठी माहे ऑक्टोंबर २०१५ पर्यंत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय ,

(2) असल्यास, उक्त औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान महामंडळाकडे मागणी केलेली आहे, हे ही ीखरे आहे काय ,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई : (१) चिंचोडी येथील औद्योगिक क्षेत्राचे सर्व्हे व डिमार्केशनचे काम पूर्ण झालेले असून महामंडळाच्या नियोजन विभागाकडून आराखडयास मे, २०१५ मध्येच मंजुरी देण्यात आलेली आहे. तसेच सदरर औद्योगिक क्षेत्रात पुरविण्यात येणाऱ्या पायाभूत सोई-सुविधांना प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधीचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे.

(2) व (३) हे खरे आहे.

uuuuu चिंचोडी औद्योगिक क्षेत्रासाठी नांदुरमध्यमेश्वर धरणातून पाण्याचा स्त्रोत गृहीत धरुन पाणीपुरवठा योजनेसाठी ी रु. २०७४.४२ लक्ष निव्वळ व रु. २३८५.५९ लक्ष ठोक इतक्या रकमेचा प्रस्ताव व पायाभूत सुविधा यांना प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव महामंडळात तयार केला असून तो मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे.

(4) प्रश्न उद्भ ावत नाही.

---

u

राज्यातील अनुदानित वसतीगृहातील आठ हजार कर्मचाऱ्यांना मानधन न मिळाल्याबाबत

u

(106) * u२८४०१ uu**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम)म:म** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u(1) राज्यातील अनुदानित वसतीगृहामध्ये तसेच पुणे जिल्ह्यातील शासनमान्य अनुदानित वसतिगृहामध्ये काम करणाऱ्या सुमारे आठ हजार कर्मचाऱ्यांना अत्यंत अल्प मानधन दिले जाते, तसेच उक्त कर्मचा-यांचे मागील दीड वर्षापासून मानधन थकीत असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त वसतिगृहातील कर्मचा-याना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा विषय मागील अनेक वर्षापासून प्रलंबित आहे तसेच सदर वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत मंत्री मंडळासमोर सादर करण्यास मान्यता देण्यात आली होती व सदर निर्णय होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात वसतीगृह कर्मचाऱ्यांना मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, दिनांक ९ एप्रिल, २०१३ मध्ये मंत्रिमंडळ बैठकीत मानधनात वाढ करण्याचा निर्णय होऊनही तसेच दि. ३० ऑगस्ट

२०१५ रोजी मा. वित्त व नियोजन मंत्री यांनी ी सामाजिक न्याय विभागाला । १०० टक्के अनुदानित वसतीगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास आदेश दिले, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग तसेच सामाजिक न्याय विभागाने सादर न केल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांना मानधन व वेतनश्रेणी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, मानधनाअभावी सदर कर्मचाऱ्यांवर आलेली उपासमारीची वेळ लक्षात घेता मानधन व वेतनश्रेणी लागू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,` नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजकुमार बडोले : (१) अंशत: खरे आहे.

(2) मागासवर्गीय मुलामुलींच्या अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय झाला त्यानुसार दि. १५.०६.२०१३ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(3), (4) व (५) अनुदानित वसतिगृहातील अधीक्षक या पदास वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत महाराष्ट्र राज्य अनुसूचितवसतिगृह कर्मचारी महासंघाने केलेली मागणी तपासून त्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत मा. मंत्री (वित्त) यांनी दि. ३०.०८.२०१५ च्या पत्राद्वारे सामाजिक न्याय विभागास कळविले आहे.

अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्राप्त मागणीस अनुसरुन तयार केलेला प्रस्ताव शासन स्तरावर अमान्य झाला आहे. सदर वस्तुस्थिती नस्तीवर सादर करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील दासगांव खाडीपट्टी विभागातील नागझरी नदीवरील वामणे व तुडील या विभागातील गावांना जोडणारा साकव धोकादायक झाल्याबाबत

(107) * u३१३२५ uuश्री.भरतशेठ गोगावले (महाड)ड:ड सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) रायगड जिल्ह्यातील दासगांव खाडीपट्टी विभागातील नागझरी

नदीवरील वामणे व तुडील या विभागातील गावांना जोडणारा साकव (छोटा पुल) धोकादायक बनला असून या पुलावरून वामणे गावातील ५३ वर्षीय महिला साकवावरील कॉंक्रीट शिडी तुटून ३० फुट खोल दरीत कोसळल्याची घटना नुकतीच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये घडली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त जखमी महिलेस उपचारार्थ रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उपरोक्त साकव जवळपास २० वर्षे जुना असून या साकवावरून रावढल, नखण, चांदलेकोंड, आंबेवाडी, भेलोशी या गावातील ग्रामस्थांना येजा करण्यासाठी वापर करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त साकवाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(5) तदनुसार सदर साकवाच्या दुरूस्तीकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

u

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (2)2 व (३)३३होय, हे खरे आहे.`` ``

(4)4जिल्हा परिषदेमार्फत साकवाची पहाणी करण्यात आली असून प्रश्नांकित साकव हा जुना असल्यामुळे पुर्वी टाकलेल्या कॅ ाक्रीट स्लिपर्स ह्या कमकुवत झाल्या आहेत. व लोखंडी सांगाड्याचे खालील ॲगल्स गंजुन निकामी झाले आहेत.

(5) प्रश्नांकित साकव दुरुस्ती करिता जिल्हा परिषद रायगड यांच्या स्वनिधीमधून निधी देण्यात आला आहे.` जिल्हा परिषद, रायगडड यांनी ी सदर साकवाच्या दुरुस्तीकरीता प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली ी असून ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे.

मुंबई एन्ट्री पॉईंटवरील पाच टोल नाके रद्द करणेबाबत

(108) * u३१३६३ uu**श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड)ड:ड** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(1) मुंबईच्या ५ प्रवेशद्वारावरील टोलमधून एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला तब्बल ११७६ कोटी रुपये प्राप्त झाले असून, टोल आणि वाहनांच्या संख्येत दरवर्षी होणारी वाढ लक्षात घेता १६ वर्षाच्या टोल वसूलीच्या ठेक्यात कंपनीस तिप्पट नफा होणार आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू पाचही प्रवेश व्दारावरील टोलमधून पुढील ३ वर्षातत प्रकल्पाची मूळ किंमत खर्च २१०० कोटी रुपये वसूल होणार असल्याने, २०२६ पर्यंत वाढवून दिलेली कंत्राटाची मुदत रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(3) तसेच मुंबई एन्ट्री पोईंटवरील पाच टोलल नाके टोल फ्री करण्याबाबत नियुक्त केलेल्या अतिरिक्त मुख्य सचिवांच्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(4) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच सदर पाच टोल नाके रद्द करण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) नाही. माहे ऑगस्ट २०१५ अखेर पर्यंत एम.ई.पी. कंत्राटात झालेल्या वसूलीची रक्कम रु. १३६२.५९ कोटी असून १६ वर्षाच्या OMT कंत्राटात होणाऱ्या वसूली व खर्चाचा हिशोब पाहता १२.६० % I.R.R. यायची शक्यता आहे.

(2) शासन अधिसूचनेप्रमाणे मुंबईतील पाच प्रवेश पथकर नाक्यांवर दिनांकक ३०.०९.२०२७ पर्यंत पथकर वसूली करावयाची आहे. सदर कंत्राट रद्द करण्याचे कोणतेही कायदेशीर कारण नाही.

(3) नाही.

(4) शासनाने अतिरिक्त मुख्य सचिव (सा.बां.विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(5) प्रश्न उद्भ्वत नाही.

विधान भवन : u **डॉ. अनंत कळसे**
नागपूर. u **प्रधान सचिव**
महाराष्ट्रविधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.